॥ ॐ ॥

सद्गुरू श्री इमामशाहा महाराज

संक्षिप्त जीवन गाथा



लेखक :- आचार्य श्री जगन्नाथजी महाराज

✻ लेखक व प्रकाशक ✻

आचार्य श्री जगन्नाथ महाराज

Real Patidar Library

About Real Patidar books

You can resize and move this box in any PDF Application like Adobe Acrobat Reader.

Use the Bookmarks facility in the PDF to directly go to the pages containing Highlights.

For Reference See Pages: 2, 4, 8, 9, 10, 11, 15, 16, 17, 18, 19, 20, 22, 27, 30, 31, 34, 35, 36, 49, 52.
For page numbers, see the page footer. Page numbers are in 'Page x of y' format

॥ ॐ ॥

सद्गुरु श्री इमामशाहा महाराज

संक्षिप्त जीवन गाथा



लेखक :- आचार्य श्री जगन्नाथजी महाराज

❊ लेखक व प्रकाशक ❊
आचार्य श्री जगन्नाथ महाराज

लेखक :

आचार्य श्री जगन्नाथ महाराज

प्रकाशक :
श्री सत्पंथ साहित्य प्रकाशन,
श्री सत्पंथी मंदीर, फैजपूर - ४२५५०३
ता. यावल, जि. जळगांव
फोन नं. ०२५८५ (११३) ४५४१७

आवृत्ती १ ली
सन २००१
प्रती - १०००
मुल्य - रुपये १०/-

मुद्रक :
कांचन ऑफसेट,
फैजपूर, ता. यावल, जि. जळगांव
फोन नं. ०२५८५ (११३) ४५६४९

''दिव्यत्त्वाची जेथे प्रचिती
तेथे कर माझे जुळती''

पंधराव्या शतकात प्रगट होऊन स्वतः बैलगाडीने प्रवास करून अपार कंष्ट सहन करून विशेषतः समाजातील अत्यंत हीनदीन दारिद्याने पिडलेल्या, परिस्थितीने खंगलेल्या, दुष्काळ अवर्षणाने त्रासलेल्या जनतेस त्यांच्या प्रमाणे बनून ज्यांनी सनातन वैदिक धर्माचा उपदेश केला. अनंत प्रकारच्या सामाजिक अडचणी सोडवून लोकांना वैदिक शुध्द कर्मकांड शिकविले, गावो गाव फिरून जनता जनार्दनामधून सव्वा लाख मुखी नेमून त्यांच्याकडून पूजा अर्चा कर्मकांड शिकवून वैदिक ज्ञानाचा सुध्दा आपल्या ग्रंथामधून लोकांना मार्ग शिकविला, द्वैत अद्वैत भक्ति प्रेमभक्ति व दिव्य भक्ति लोकांना शिकविली, आज त्या सद्‌गुरू श्री इमामशाह महाराजांस माझा सहस्त्रशः सहस्त्रशः प्रणाम ॐ शांतिः। शांतिः ।। शांतिः ।।।



※ निवेदन ※

परमकृपाळु भगवंताच्या असीम कृपेने या जगतात असंख्य अवतारी पुरूष अवतरीत होत असतात. या जगतावर भगवंताचे खूप उपकार आहेत. हे जग जरी दुःखाने भरलेले असले तरी महापुरूषांच्या मार्गदर्शनाने सुखाचा शोध करता येतो, करण्याची इच्छा मात्र हवी. स्वतः महापुरूष मात्र अपार दुःख सहन करून, हालअपेष्टा सोसून, विटंबना सहन करून जगाला चांगलाच मार्ग दाखवितात. लोक कल्याणाचा मार्ग दाखवून मोकळे होत नाही ते स्वतः राबतात व जगताला ललामभूत आदर्श दाखवून जातात.

महापुरूषांना जातपात वर्णभेद, वंशपरंपरा, वगैरे काही नसते. ते तो भेद मानतच नाही त्याच्या पलिकडे महापुरूष गेलेले असतात. जगताला सुयोग्य मार्गदर्शन करून मानवसमाज जास्तीत जास्त सुखी कसा होईल हे शिकविण्याचे काम ते करीत असतात.

Career of Imamshah Birth and Death

Nishkalanki Narayan avatar at the end of Kaliyug

सांप्रत आपण ज्यांचे चरित्र वाचणार आहोत ते महापुरूष १४ व्या शतकातील म्हणजे १४४० ते १५०१ ही त्यांची कारकिर्द. पंजाब मधील मुलतान येथे त्यांचा जन्म सैय्यद घराण्यात झाला. परंपरेने त्यांना पित्याकडून मरणोत्तर दिक्षा मिळाली. ते निष्कलंकी नारायण जो दहावा अवतार कलीयुगाच्या शेवटी होणार आहे त्याची उपासना करणारे. इमामशाहांची शिकवण म्हटली म्हणजे ज्योतिस्वरूपाचे ध्यान, ॐ चे स्मरण, कलश घटपाटाची पूजा, अथर्ववेदाच्या मंत्रानुसार कर्मकांड करणे, युगधर्माप्रमाणे चार वेद प्राधान्य भूत; भगवंताच्या मुख्य दहा अवतारांची उपासना व हे जो मानणार नाही त्याला लक्ष चौर्याशीचे फेरे खावे लागतील अशा प्रकारची शिकवण इमामशाहांनी सत्पंथाद्वारे दिली.

परब्रह्म परमेश्वराच्या प्राप्तीचा जो अमर मार्ग तो सत्पंथ. अशा प्रकारचे विधान इमामशाहांनी केलेले आहे. त्याचे प्रवर्तक इमामशाह महाराज त्यांची ही जीवनगाथा थोडक्यात थोडकी येथे वर्णिलेली आहे. सूज्ञवाचकांनी यांच्या या जीवनाचा बोध घ्यावा ही विनंती.

प्रकाशक

ॐ

श्री सद्‌गुरवे नमः

सद्गुरू श्री इमामशाह महाराज, जीवन गाथा.

धर्मपीठ पीराणा धाम निवासी सद्‌गुरु इमामशाह महाराज्यांच्या जीवनगाथेचा हा थोडक्यात वृत्तांत आहे. बालवाचकांपासून पौढ, वयोवृध्द वाचकांना सुध्दा या जीवन गाथेचा उपयोग होईल.

भाभाराम महाराज्यांच्या तपश्चर्या भूमीत श्री नायाकाका महाराज आले असतांना त्यांच्यात झालेल्या संवादाची ही फलश्रृती आहे. सत्साधकांनो ऐकातर त्यांची परमपावन अमृतवाणी.

भाभाराम महाराज म्हणाले, "महाराज! ज्यांनी तुम्हाला क्षणमात्रांत पूर्ण ब्रम्हज्ञान समजावून शिकविले आणि अनुभवास सुध्दा आणून दिले अशा पूर्ण ब्रम्ह सच्चिदानंद स्वरुपाचे दर्शन घेण्याची माझी पूर्ण अभिलाषा आहे ती आपण पूर्ण करावी . मी आपणांस शरण आलेलो आहे. ज्यांच्या चरणारविंदी अडुसष्ठ तिर्थ हमेशा हात जोडून अधिन राहतात अशाच संत पुरुषाच्या दर्शनाने मुक्ती मिळते. धन्य आहे त्या महात्म्यास की ज्याने परमार्थ संकट सहन करुन परदुःख दुर केले , देशोदेश फिरुन पापी लोकांवर प्रेमकरुन त्यांना सुधारुन सुमार्गावर आणले . आपली सुध्दा धन्यता आहे आणि आपल्या कुळाची पण धन्यता आहे की ज्यांना अशा संतपुरुषाची सेवा घडली ज्यायोगे असे परमार्थ कार्य आपणाकडून घडले. महाराज! हे सच्चिदानंद परमात्मा स्वरुप कोणत्या वेशात देशात

आहेत ते कृपा करुन मला सांगा. मी आपला दास आहे. मी आपला अत्यंत आभारी आहे. स्वामी माझी विनंती स्विकारा व त्यांचे जीवनचरित्र मला सांगा".

संत नायाजी म्हणाले, "हे महात्मन् त्यांचे जीवनचरित्र ऐकण्याची इच्छा आहे तर ऐका, मनुष्य देहामधील कोणताही पवित्र हृदयाचा महात्मा त्यांची पवित्र कथा ऐकेल त्याचे त्रिविध ताप नाहिसे होतील. ज्यांचे जन्मकर्म दिव्य आहे अशा महापुरुषाचे चरित्र जन्ममृत्यूपासून सोडविणारे असते".

वाणी शकेना वर्णवी सद्‌गुरु तणु स्वरुप।
बुध्दि मन पहोचे नही. छे उपमा रहित अनुप।।

भाभाराम महाराज! मी त्या महापुरुषाचे जन्माकर्माचे पुरेपूर वर्णन तर करु शकणार नाही पण थोडक्यात थोडके समुद्रात खसखस पडावी त्याप्रमाणे माझ्या स्मरणात आहे तेवढे वर्णन करुन सांगतो .

गुरु गुरुमें भेद है , गुरु गुरुमे भाव ।
सोही गुरु नीत वंदिये, शब्द बतावे दाव ।।
पुरा सद्‌गुरु ना मिला सुनि अधुरी शीख ।
स्वांग जतीका पेहेरके घर घर मांगे भीख ।।
गुरुसे सद्‌गुरु बडे परमेश्वरके रुप ।
मुक्ति छाई पोहचाईदे जगत छोडावे भूप।।
कुलं पवित्र जननीकृतार्था, वसुंधरा पुण्यवतीच नेन ।
अपार संवित्सुख सागरेऽस्मिन्लिनं परब्रम्हणि यस्यचित्तः।।

अपार ज्ञान आणि सुखसागर रुप परब्रम्हात ज्याचे चित्त लिन झाले आहे असे महात्मा पुरुष ज्या कुळात जन्मतात ते कुळ पवित्र होते.

ज्या मातेच्या उदरी जन्माला येतात ती जननी कृतार्थ होते आणि ज्या भूमिवर ते जन्माला येतात ती भूमि भाग्यशाली होते.

दुर्लभ दर्शन चरण गहूँ ,पावन जीवन करत इन्सान।
सत्पंथ सत धारण कर, सत् धर्म चलत सत प्राण ।।
सब हिरदे अेक है, सत् सार जानी महाभाग ।
सत् तत्व ही परब्रम्ह है, सत् रुप तत्व अनुराग।।
त्रय वेदोंका मधुसार कहै ,पंचत्वलीन इमाम ।
अथर्ववेदका आश्रीत ,शाहा करै ज्ञान तमाम।।
शाह इमाम नाम पढ , दुश्मन करत है पुकार ।
ना जानत सत् सारको, करत भेद गँवार ।।
सद्गुरु हिरदे भेद नही, भेदीके मनमे भेद ।
वही मूरख दुष्कर्म करे , जनताके हिरदे छेद।।
वचनामृत शाह इमामके ,हिरदे रहेंगे खास।
आशिष वरदहस्त पीरके, रहे हमारे पास।।

अशा या महान संताची पर्वपिठीका व त्यांनी ख-या हिंदुत्वाच्या रक्षणासाठी अखंड तेवत ठेवलेल्या दीपरूप सत्पंथ दर्शक जीवनाचा अल्पसा परिचय करून देण्याचे धाडस त्यांच्याच कृपा प्रसादाने करीत आहे.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवती भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदाऽऽत्मानंसृजाम्यहम् ।।४।७

अमानवीय दुर्जनांकडून राक्षसी अत्याचार धर्मपरायण समाजावर होतो तेव्हा प्रभु अनेक घरात कुटुंबात आपल्या सद्गुणी आत्म्यांनाही आपल्याबरोबर जन्मास घालतो व संत महंताचे रुपात व शूरवीरांचे स्वरुपात त्या धर्माचे रक्षण करतो. ह्याच काळात ज्ञानेश्वर ,एकनाथ,

Name of Imamshah = Saiyyed Abdul Rahim

Known by Saiyed Imamshah

Meaning of names

नामदेव, तुकाराम, रामदास, कबीर,रहीम आदी संतांनी जन्म घेऊन सर्वसामान्य समाजाला धर्म जागृती देऊन यवनी सत्तेला तोंड देऊन त्यांची संस्कृती नष्ट करुन सनातन संस्कृतीला पुष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. याच धुमश्चक्रीचे काळातच चक्रधरस्वामी यांनीही कृष्णपंथीय महानुभाव पंथ निर्माण केला. असाच एक संत 'सहयद' घराण्यात उदयास आला. त्याचे मूळ नाव 'सहयद अब्दुल रहिम' होते. या संताने चारही वेदांचा अभ्यास करुन अथर्ववेद साररुप घेवून 'संत्-पंथ' दिग्दर्शित केला व हिंदुधर्मास टिकवून धरण्याचा खुप मोठा प्रयास केला. अशा या महात्म्यास सहयद इमामशाह याच नावाने जाणतात.

अब्दुल रहिम म्हणजे 'अब दिलमे रहिमवाला' आया. इमामशाह म्हणजे 'माम् ईश आह' जो योगेश्वर आहे तो.

आंग्ल, गुरुंड ,शिया ,सुन्नी पंथीय राजे यांनी भारतात अनेकदा क्रुर-पणाने आक्रमण केले व शस्त्रांचा धाक दाखवून इस्लामी धर्म स्विकारण्यास भाग पाडले. सोमनाथवर स्वारी, विशेषतः हिन्दूधर्म मंदिरावर धाड टाकून सारं लुटीत व प्रजा जीव घेऊन इतस्ततः पांगत. अशावेळी संपत्ती बरोबर ते स्त्रियांचे ही अपहरण करीत. जे भारतात राहात ते येथील जनतेवर अत्याचार करुन धर्म प्रचार करीत. सम्राट अकबर औरंगजेब, सुलतान यांनी तर अनेक राजपूत वीरांच्या पत्नी, कन्या बहिणींना राण्या केल्या. न मानणाऱ्यांचा अनन्वीत छळ करीत. अशा समयी इराण, इराक, अफगाण, पेशावर या प्रान्तातही असाच धुमाकुळ चालू होता. अरबस्तानातही पूर्वी सूर्यपूजा, अग्निपूजा, वरुण पूजा करणारी आर्यवंशीय प्रजा होती.तेथेही मंदीरे होती पण त्यांचा विध्वंस झाला. तत्कालिन या भंजकांना 'बूतफरामोश' म्हणत. असे म्हणतात की आजही मक्का मदिना येथे हिंदुधर्मीय प्राचीन

This book does not give complete details of life of Imam Shah. Under use of Taqiyya, some of the facts are distorted.

मंदिरांचे अवशेष आहेत.

याच काळात अनेक इराणी अग्निपूजक या जाचास कंटाळून जन्मभूमिचा त्याग करुन धर्म व जीव संरक्षणार्थ भारत वर्षात आले. व तेथेच स्थायिक झाले. तथापि त्यांनी आपल्यामूळ परंपरेला सांभाळून आचार व्यवहारात तत्कालिन इस्लामिक धर्माचरणाचा स्विकार केला व त्या मार्गाने आपल्याच संस्काराची जोपासना करुन वंशवृध्दि चालविली होती. त्यातील एक सहयद घराणे पंजाबात मुलतान शहरी आले होते ते घराणे सुसंस्कृत व धार्मिक होते. सहयद म्हणजे 'सहयज्ञ' करणारे होय.

आजचे सय्यद घराणे मूळचे ब्रम्हपरायण असावे, कारण गीता अ. ३ श्लोक १० प्रमाणे हया घराण्याला मूळपुरुषाचे उत्पत्तिवरुन वाटते की सहयज्ञातून प्रगट झालेल्या पुरुषास सहयज्ञी असे संबोधिले गेले व त्याचा इस्लामी उच्चार सय्यद झाला.

सहयज्ञाः प्रजाः सृष्टवा परोवाच प्रजापति ।
अनेन प्रसदिष्यध्वमेष वोऽस्विष्टकामधुक ।।. ३/१०

गीताधारे हया श्रुतिवर नितांत श्रध्दा असलेले हे घराणे उंच मुलतान म्हणजेच तक्षशिला येथे कालक्रमणा करीत होते. या वंशातील तत्कालिन गृहस्थ सय्यद कबीरोदद्दीनशाह यांनी तीन पत्न्या केलेल्या होत्या . त्यांच्यापासून बराच वंश विस्तार झाला. पण त्यांच्या तिसऱ्या पत्निपासून सर्वात लहान मुलगा झाला त्यावेळी कबीरोदद्दीनशाहास आदेश मिळाला होता की तुझ्या घरात अविगत अविनाशीची अखंड अमर ज्योत प्रगट होत आहे. त्या आदेशाप्रमाणे हिजरी सन ८५६ च्या सफर महिन्याच्या २७ तारखेस वि.सं. १४९६ म्हणजेच इ.स. १४४० मध्ये त्यांना भद्ररुप तेजस्वी ब्रम्हरुप योगी शांत मुखमंडल असा देवस्वरुप

पुत्र झाला . त्याचे मुखमंडल पाहून व सुवर्णमय कान्ति पाहून मुलतान शहरात ही वार्ता पसरताच लोक त्याच्या दर्शनास येवू लागले सा-यांनाच प्रभू प्रकट झाल्याचा आत्मिक आनंदानुभव येवू लागला. आता आपल्यावर होत असलेल्या आक्रमक परिचक्रातून नक्कीच सुटका हा करणार असे वाटू लागले . हयाचे नांव सय्यद अब्दूल रहिम असे होते.

कबीरोद्दीनबाबांची मोठी मुलं ह्या आक्रमक काळात हळूहळू वाढत होती व तत्कालीन परिस्थितीच्या परिणामामुळे इस्लामी वर्चस्वाने त्यांच्यात त्या धर्माचा परिणाम झाला होता. ती मुलं महंमद पैगंबराचा कुराण प्रणित आचारधर्म पाळीत होते. पण इमामशाह मात्र त्यांच्यापेक्षा निराळयाच वृत्तीने वागत. असे म्हणण्यास प्रत्यवाय नसावा. तो आर्य धर्म वेदप्रणित सहिष्णू वृत्तीने वागत असे. बालपणापासून अखंड ॐ चे स्मरण ,ज्योतीचे ध्यानचिंतन, आसन समाधीचा अभ्यास वगैरे कृतीमुळें घरात सदैव ह्याच्या कृतीला विरोध होत असे . घर अशांत राही. घरात कबीरोद्दीनबाबा सत्पंथ घटपाटाची पूजा ज्योतीचे ध्यान करीत व तेच इमामशाहाला आवडत असे. शेवटी त्यांचे वडिलांनी त्यास हाजरबेग नावाच्या सेवकाबरोबर बालपणातच घराबाहेर धर्मप्रचारार्थ पाठवून दिले. हे दशवर्षिय स्वयंसिध्द ज्ञानी बाळ घरून भ्रमण करायला निघाले. मुलतानहून राजस्थान ,मेवाड,चितोड आदि प्रदेशातून अत्यंत घनदाट अरण्ये ओलांडून लहानसहान खेड्यातून लोकजागृती करीत निघाले. प्रत्येक खेड्यापाड्यातून त्यांनी स्वधर्माचा अभिमान राखण्याचे शिकविले. त्यांची शिकवण होती की,

Ghatpat by Kabiruddin

Hazarbeg

इस मिटीमे सारी दुनिया निपाई ।
इसीमे कौन हिन्दु इस्लाम ईसाई ।।

या हिन्दूस्थानावर यवन म्लेंच्छांचे राज्यप्रसार व धर्मप्रसाराच संकट चालू असतां ह्या दमनकारी प्रसंगी हिंदु-इस्लाम प्रजेला अने॰ संत-सुफीसंतांनी धीर दिला. वेळीच समाजाला संघटीत करून अध्यात्मिक अथर्ववेदीय ज्ञानशक्तिने हे परचक्र नेस्तनाबूद करण्याचे महानकार्य सय्यद अब्दुल रहिम या संताने केले. तत्कालिन प्रजेने व अनेक सत्धर्म प्रचारकांनी म्हटले आहे की, 'हे प्रभु परमेश्वरा तुझ्या चरणी पवित्र पूजास्वरुप हा पुत्र कबीरोददीनने अर्पण केला आहे त्याचा तू सांभाळ कर' तेव्हापासून हया पुजेच्या इमाम अशा उच्चारानेच त्या सय्यद अब्दुल रहिमला इमाम म्हणू लागले.

पुत्रेषु ज्ञानश्रेष्ठेषु ज्ञान तेजो च सर्वदा ।
इमां मया कृतां पूजां गृहीत्वा व्रज शांतये ।। अग्निपुराण.

या काळात इस्लामी राजांचे भारतात बरेच वर्चस्व होते. त्या भयानक अवस्थेत हिंदुत्वाचा प्रचार करणे म्हणजे राजधर्माचे विरुध्दच . यास्तव या महात्म्याने वरवर इस्लामी धारणा दाखवून अंतर्यामी मात्र योगेश्वरी प्रचार होता. यास्तव त्याने आपले नावही मी योगेश्वर आहे, माझ्यावर विश्वास ठेवा. असे प्रतिपादून स्वतःचे दुसरे नाव दुस-यांचा विश्वास बसावा म्हणून संस्कृत वाक्यात बदल करुन नाव सांगितले ते असे की 'माम् ईश आह' इमामशाह.

False planted stories
Mam-Ish = Imamshah

शाह इमाम लहानपणापासूनच आपल्या सर्व बंधुपेक्षा वेगळया प्रकारे वागत असे खेळ,शिक्षण, प्रार्थना मग काही असो त्याचे हे वेगळेपण त्यांच्या बंधूंना नेहमी खटकत असे. त्यामुळे ते त्यांना अनेकानेक मार्गांनी त्रस्त करीत. प्रार्थना करायला आरंभ करतांना ते प्रथम दीप पेटवीत असत.दीप केवळ एकच असायचा पण त्याच्या दिव्यशक्तीने

Most of these stories are concocted and planted. For real knowledge read Collectanea by Vladmir Ivanow

यवनीवृत्ति अन्य बांधवांना व इतरांना अनेक दिवे दिसत. त्यामुळे ते अब्दुलला- इमामला विचारीत की तू इतके दिवे का लावतोस? तेव्हा इमाम त्यांना उत्तर देई की हे प्रभुनेच लावले आहेत. पण असे का? तर माझ्या पूर्व जन्माची गोष्ट ऐका, 'जंबुद्विपातील अतिपश्चिम भागात (अरबस्तान) मक्कामदिना येथे प्राचिन काळात जे लोक राहात होते त्यांचे बाबत ईशावास्योपनिषदात म्हटले आहे कीं,

असूर्या नाम ते लोका अंधेन तमसाऽवृता ।
तांस्ते प्रत्याभिगच्छन्ति ये के चात्महनो जनाः ।।

आत्मज्ञानाचे शत्रुत्व करणारे आत्मघातकी लोक देहपडल्यावर गाढ झोपून राहतात. ते पुनःजन्माला येत नाहीत. अशा भयानक काळात मी एका सूर्यमंदीरात सूर्यसेवक होतो. माझे नाव 'भद्र' होते. कार्तिक मासात मी असाच दीप प्रज्वलित करीत असता त्या प्रदेशात माझा एकाएकी अंतःकाळ झाला. देह सोडून मी सूर्यासमोर उभा राहून जणूं वडिलावर रागे भरतात त्या प्रमाणे मी त्यांच्यावर रागे भरलो . माझा देह तेथेच पडून होता मला सूर्यदेवाने परत त्याच स्थळी पाठविले. मला परत जीवन प्राप्त झाले पण देह घृणास्पद अवस्थेतला आढळला. मी तेथीलच एका पूजा-याजवळ आश्रीत म्हणून राहिलो. मी तशाच अवस्थेत मूर्तिपुढे अखंडदीप लावला व देहशुध्दिसाठी मूर्तीची प्रार्थना केली काही काळाने एकदा एका यवनी बुध्दीचा अध्यात्माचा शत्रू असलेल्या दुष्ट प्रभाव मजवर पडला तो असा की सूर्यमूर्तीचे अंगावरील सूवर्ण अलंकार काढून घेवून येथून पलायन करावे. तो दिवस अमावश्येचा होता. त्या अंधाऱ्या रात्री एकाएकी अखंड दीप विझला. सर्वत्र अंधार, पूजारीही आपल्या शयनस्थानी गाढ झोपेत. अशा निस्तब्ध मध्यरात्री मी जागाच होतो, मी

उठलो व आवाज न करता चोर पावलांनी मूर्तिजवळ जावून दीप लावून मूर्तिचे अलंकार काढण्यास वळणार तोच तेथे पूजारी हजर झाला. मी मनात घाबरलोच. तेथेच मूर्तिच्या चरणावर मी पडलो . तेवढयात सर्व मंदीर प्रकाशमान झाले व अनेक दिवे लागल्याचे पूजाऱ्याने व अनेकांनी पाहिले. त्यांनी मला उठविले त्या समयी सूर्यदेवाने मला उपदेश केला. 'तू भद्र आहेस परंतु तुझ्या मनात देवमूर्तीवर आक्रमण करण्याची पापबुध्दि जागृत झाल्यामुळे तुझ्या अशुध्द अपवित्र देहातून काढून तुला येथे आणले.नियम पाळले तर यम तुला मुक्त करील व परत मानवी देहातच तुला जावे लागेल. या अविचार-अशुध्द-अभद्रपणाचा परिणाम तुला आढळून येईल. जा अभद्रा भद्र हो'. भगवान सूर्यदेवाच्या वचनाप्रमाणे मला यमराजाने पुनर्जन्म दिला तो हाच होय. तेव्हापासून मी सदैव दीप प्रज्वलीत करुन सेवा करीत असतो. पुढे हेच माझे प्रतिक अखंड दीपांच्या रुपाने प्रज्वलीत राहणार आहे. तो आकाशगंगेच्या स्वर्गगंगेच्या व गतगंगेच्या रुपाने आहे. सर्वांच्या हृदयी आत्मरुपी ज्ञानदीप प्रज्वलीत करण्यासाठीच मला हा जन्म प्राप्त झाला आहे. उपनिषद ग्रंथात शांती मंत्र आहे की .

भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्रा : ।
स्थिरैरंगैस्तुष्टुवाँसस्तनुभिः व्यशेम देवहितं यदायुः ।।

शाह इमाम त्या सर्वांना लोकभाषेत सांगत होते की ' कानांनी भद्र (पवित्र) ऐकावे, पवित्र पहावे व सत्य बोलावे ,भद्रच (कल्याण) करावे यासाठीच भद्र जीवांना या इहलोकी अशा अभद्र गोष्टींचा व देहाचा नाश करण्यासाठीच सूर्यदेव जन्माला घालीत असतो व असूर्यलोकात नवविधाभक्तिचा अखंडदीप अथर्ववेद प्रमाण मानून ज्ञान प्रसार करुन

प्रज्वलित करण्यासाठीच मी आलेलो आहे'.

श्रवणं कीर्तनं विष्णो: स्मरणं पादसेवनम् ।
अर्चनं वन्दनं दास्यं सख्यात्मनिवेदनम् ।।

अशाप्रकारे नवविधभक्तिची महती वर्णन करून तत्कालिन यवनांच्या अमानुषी आक्रमणात धीर देवून सामान्य जनतेला त्यांनी सांभाळलं. त्यांच्यात मिसळून त्यांनी आत्मियता जोपासली. बालवयातच त्यांनी घराबाहेर पडून हे लोकजागृतीचे कार्य केले आहे. सामान्य दीन दु:खित पतित जनतेत ईश्वर भक्ति प्रेम जागृत केले व एक अनन्य साधारण भक्तिमार्ग 'सत्पंथ' रुपाने दिग्दर्शित केला.

योगविभुति अवनीमे, प्रगटे शहर मुलतान।
अविगत को कैसे बुझे, कहाँ हिन्दु मुसलमान ।।
बाबा कबीरुद्दीनको, अविगतकी गम पाय।
अमर ज्योत अविनाश की, तेरे घर प्रगटाय ।।

इमामशाह यांच्या जन्माच्या आधी असा आदेश मिळाला की अविनाशीची अमरज्योत तुझ्या घरात प्रकट झाली आहे. आश्चर्यचकित झालेल्या पित्याने जाऊन मुलाचे मुखारविंद न्याहाळले आयुष्यात काधिही पाहिली नसेल अशी दिव्य कांती आणि तेजोमयमुख पाहताच ते परमानन्दात मग्न झाले. त्याचे नाव इमामशाहा ठेवण्यात आले.

चार वर्षाचे वय झाल्यावर त्यांना शाळेत दाखल केले परंतु ते तर सर्वज्ञान संपन्न होते त्यांना शिकायचे काय बाकी होते? त्यांच्या पूर्वजन्मात ते सूर्य भक्ति करीत ज्योतिची उपासना करीत, त्याच्याही आधिच्या जन्मात ते सौम्य शांत प्रवृत्तीचे शमीक ऋषि होते, युगधर्मानुसार ते या युगातील युगगुरु असल्याने संपूर्ण वेद शास्त्र उपनिषदांचा अभ्यास

त्यांनी मागच्या अनंत जन्मातच केलेला होता. शिकण्याकरिता ते शाळेत गेलेच नाही अनेकांचे वेगवेगळे दुःख दूर करण्याकरिता ते शाळेत गेले.

कोण्या आंधळयाला दृष्टी दिली. कोण्या बहिऱ्याला श्रवणशक्ति दिली. कोण्या मुक्याला वाचा दिली. तर निर्धनाला धनवान केले, कोण्या वंध्येला पुभलाभ घडविला तर कोण्या पांगळयाला सरळ केले एक ना दोन या अद्‌भूत बालकाच्या प्रभावाने सबंध मुलतान शहर त्याच्यामागे धावू लागले.

गंगासिंह गोहिल यांनी रचलेल्या काही काव्यपंक्तीतून इमामशहांचे चरित्र आणि त्यांच्या दिव्य शक्तिचा परिचय होतो. एकदा मुलतान शहरात काहि जोगी लोक आले. त्यांच्या कानावर इमामशहांची किर्ती गेली आणि ते या दिव्यशक्तीधारी बालकाला भेटायला गेले, त्यांना मनात वाटत होते की आपण योगी लोक ,आपण जीवनभर योगसाधना करुन अजून ते साध्य करु शकलो नाही ते या लहान बालकास घरबसल्या कसे साध्य होईल बरे ?

योगी लोक संघ घेवून चालले होते. त्यांच्यामध्ये कानपुर, काश्मिर, कर्नाटक, कोकट तर कलोल वगैरे विभागातील लोक होते, त्यांना आठ वर्षाच्या इमामने सर्व प्रकारच्या योगक्रियांचे दर्शन घडविले. संसार काय आहे आणि जगदीश व त्याची माया कशी आहे याचे ज्ञान विस्तारपूर्वक समजाविले . त्यामुळे त्यांचा अहंकार नष्ट होवून सत व असत विवेकबुध्दीने कसे जाणावे हे ज्ञान प्राप्त झाले. त्यांनी आपल्या मुद्रिका काढून इमामशाह चरणी अर्पण केल्या व इमामशाहला गुरु मानले असे प्रसंग त्यांच्या जिवनात वारंवार येवू लागले.

संत कबीरदीनचा अंत:काळ जवळ आल्याचे जाणून त्यांनी विचार

केला की इमामशाह लहान वयाचा असल्यामुळे व माझ्यावर त्याचे अतिशय प्रेम असल्यामुळे माझ्या मृत्यूचे दुःख तो सहन करु शकणार नाही, म्हणून आताच याला मी दुस-या देशात पाठविले. तर लोकांना यांच्या ज्ञानोपदेशाचा लाभही मिळेल व जगताचे सुध्दा कल्याण होईल. म्हणून त्यांनी इमामशहांना जवळ बोलविले व सांगितले, बेटा इमाम ! तुझे प्रागटय लोककल्याणासाठी आहे . तुझ्या जन्माच्या वेळी मला भगवतांचा आदेश झाला होता की 'माझी अमर ज्योत तुझ्या घरी आली आहे तू त्या ज्योतिला एकाच ठिकाणी बंधनात न ठेवता चौफेर त्या ज्योतिचा प्रकाश पसरु दे. म्हणून बाळा तू ज्ञान प्रचाराचे कार्य करण्यास तत्पर हो. लोककल्याणाचे महान कार्य तुझ्या हातून घडायचे आहे.'

Hazarbeg →

पीत्याची आज्ञा होताच बाल इमामने 'हाजरबेग' नावाच्या आपल्या परमप्रिय सद्भक्ताला जवळ बोलविले व त्याला धर्मोपदेशाकरिता मुलतान सोडून गुजराथकडे जाण्याचा विचार सांगितला . हाजरबेगने बैलगाडीचा रथ तयार केला व इमामशहांना बरोबर घेऊन गुजराथकडे प्रयाण केले.रस्त्याने जात असता जेथे जेथे रात्र होई तेथे त्यांनी आपल्या ज्ञानाचा उपदेश केला. लोक अत्यंत प्रेम भावाने तो उपदेश ऐकत असत. त्यांचे वय पाहून लोक आश्चर्य करीत व उपदेश ऐकून त्यांच्याकडून दीक्षा घेत, सत्संग करीत असत.

एकदा गुजराथ मधील कश्मोरा शहराजवळ कोटली या गावी मुक्कामी असतांना व रात्री प्रवचन चालू असतांना सद्गुरु महाराज एकदम थांबले. ते ध्यानस्थ झाले. त्यांच्या डोळयातून अश्रुधारा वाहू लागल्या . ध्यान संपल्यावर लोकांनी विचारले 'महाराज आपणास काय

झाले ? आपण प्रवचन का थांबविले? आपणास बरे नाही का?'

सद्‌गुरु इमामशाह म्हणाले, नाही नाही तसला काही प्रकार नाही. आता एवढयात माझे पिताजी मुलतानला स्वर्गवासी झालेले आहेत. आणि सकाळी सूर्योदयापर्यंत त्यांना दफन देणार आहेत. तेव्हा आताच मला मुलतानला जावे लागेल. माझा जो हिस्सा आहे तो पिताजी बरोबर घेऊन जात आहे. म्हणून मला त्यांची भेट घ्यायची आहे.

सर्व लोक आश्चर्यात पडले मुलतान येथून जवळ जवळ चारशे मैलावर आहे जाण्यास कोणतेच साधन नाही. इमामशाह म्हणतात पित्याकडून हिस्सा घ्यायचा आहे, सर्वच आश्चर्य आहे. त्यांच्या पित्याला कब्रस्थानमध्ये जाण्याच्या आत हे तिथे पोहचले तर ठीक नाहीतर ते म्हणतात तसा हिस्सा त्यांना कोठून मिळणार. कितीही वेगवान सांडणी असली तरी २/३तासात चारशे मैलाचे अंतर कापू शकणार नाही .

इमामशाह महाराज म्हणाले, मला मुलतानला जाणे तर आवश्यकच आहे . हाजरबेगबाबा ! तुम्ही आपली बैलगाडी जोडून आणा. आपणापैकी कोणी मजसोबत यायला तयार असतील तर चला.

लोक म्हणाले, 'महाराज आपण कशा वेडयासारख्या गोष्टी करता आपण म्हणता बैलगाडीने जावू, ते कसे शक्य आहे? ४ तासात १०० मैल जाणारे साधन कोणते असणार? सूर्योदयाच्या आत कोणत्याच साधनाने जाता येणार नाही.

इमामशाह म्हणाले, ही माझी बैलगाडी आहे ना! हिला चौफेर फक्त तुम्ही घटट् पकडायचे व घटट् डोळे मिटून घ्यायचे. जो मध्येच डोळे उघडून पाहिल तो तिथेच थांबेल. चला कोणाला यायचे असेल तर तयार व्हा. ४० जण इमामशाहा बरोबर तयार झाले. त्यांना इमामशाहांनी

सांगितले डोळे घटट् मिटा व भगवंताचे नाव घ्या. बरोबर सकाळी ४ वाजेच्या सुमारास इमामशहांनी सर्व भक्तांना डोळे उघडण्यास सांगितले. सर्व जण मुलतानच्या स्मशान घाटीत येवून पोहोचले होते. एवढयात इमामशाहाच्या भावांनी कबीरदीन बाबाचा जनाजा समोर आणून विश्रांती करिता ठेवला.

इमामशाह म्हणाले, 'पिताजी तुम्ही माझा हिस्सा तुमच्या सोबत घेवून जात आहात . तो माझा हिस्सा मला द्या मी तेवढयाकरीता येथे येवून पोहचलो आहे'.

इमामशाहांचे सर्व भावंडे म्हणाले, 'इमाम तू मुर्खच आहे, तुझा हिस्सा पिताजींनी घरीच ठेवला आहे आणि तो तुला केव्हाही मिळेल. पण तुला हिश्याचे काय काम आहे . आम्ही पिताजींची सर्व सेवा केली तू तर सेवेच्या वेळेस गैरहजर होतास तुला कशाला हिस्सा हवा आहे.तुला हिस्सा मिळणार नाही . पिताजींचा जनाजा अडविण्याचा प्रयत्न करु नकोस'.

इमामशाह पित्याच्या तोंडाजवळ गेले व म्हणाले,'पिताजी! या लोकांसमोर माझी फजिती होऊ देऊ नका. माझा हिस्सा देवून टाका'.

इमामशाहांच्या भावांनी जनाजा उचलण्याचा प्रयत्न केला पण उठू शकला नाही , तेही हताश झाले. काय करावे कोणालाच समजत नव्हते. सव्वा प्रहर सूर्य वर आला तेव्हा कबीरदीन बाबांनी जनाजातून हात मोकळा केला व माळ काढून इमामशाहांच्या हाती दिली.

इमामशाह म्हणाले, बाबा ! ही माळ तर हाजरबेगची आहे. माझा हिस्साअजून मला मिळाला नाही. शेवटी कबीरदीन बाबांनी मुख उघडून इमामशाहांच्या मुखात वस्तू दिली. ज्या हिश्याकरीता इमामशाहांनी

प्रेतयात्रा अडविली होती तो हिस्सा इमामशाहांना मिळाला. ती वस्तू म्हणजेच दैवीकळा. पिताजी त्यांच्या सोबत घेवून जात होते ती मिळताच जनाजा उचलला गेला व कबीरदीन बाबांना इमामशाहांनी मूठमाति दिली.

मात्र इमामशाहांनी तेव्हाच प्रतिज्ञा केली की जो ॐकार , ज्योत कलशघटपाट पूजा,वेद,दशावतार यांना प्राधान्य देईल त्यासच मी प्राधान्य देईल,तेच माझे शिष्य होतील,त्यांनाच मी गुरुमंत्र दीक्षा देईल. याशिवाय मी दुस-या कोणालाही सत्पंथाची दिक्षा देणार नाही. जे सत्पंथी होतील त्यांनी माझ्या शिकवणुकीचे अनुकरण करावे,त्यांना मी मुक्तीमार्गाचे ज्ञान देईल.

इमामशाह मुलतानला असतांनाच एक आश्चर्यजनक घटना घडली. तीन महानपुरुष योगी अथवा मुखी तेथे आले. कबीरुदद्दीन बाबांचा मृत्यू झाला हे ऐकून त्यांना फार वाईट वाटले. त्यांच्या पश्चात त्या मुखी लोकांना काही दसवंतचा पैसा आणलेला होता तो आता कोणाजवळ द्यावा हा प्रश्न त्यांना पडला. कबीरदीन बाबा हयात असतांना त्यांनी सांगितले हाते की, ज्याच्याजवळ ब्रम्हकळा असेल त्यासच ही दसवंतची रक्कम द्यावी.

त्या घरात सर्वात जूना नोकर हाजरबेग होता. त्यांनी सांगितले सध्यातर ब्रम्हकळा इमामशाहातच आहे. तुम्ही इमामशाहांनाच विचारा इमामशाह महाराजांनी सुध्दा विचार केला, जर मी आता या लोकांना ब्रम्हकळा दाखविली नाही तर संत कबीरुद्दीन बाबांच्या वचनाला काळीमा लागेल व माझी सुध्दा बदनामी होईल म्हणून इमामशाहांनी मुखी लोकांना बोलविले व म्हटले बाबांनो तुम्हाला ब्रम्हकळा पहायची असेल तर माझ्या

मुखारविंदाकडे पहा. इमामशाहांनी तोंड उघडताच त्यांच्या मुखात चौदा ब्रम्हांड, चन्द्र, सूर्य , तारे,सर्व काही दिसू लागले . अनेक दैवी ब्रम्हकळांचे दर्शन त्यांना होवू लागले. हे दिव्य दर्शनअनुभवून ते लोक अत्यंत हर्षभरीत झाले. सन्मानाने दसवंत तेथे अर्पण करुन ते समाधानाने परत फिरले.

नंतर इमामशाहा सिंधूनदीच्या तिराने गुजराथ बाजूला जावू लागले रस्त्यात 'जीवन' नावाचा नावाडी नौकेने लोकांना नदी पार करीत असे. त्या दिवशी तेथे अचानक तुफान सुरु झाले व नौका बुडू लागली. जीवनने अनन्य भावाने आपल्या गुरु इमामशाहांची मनोमन आराधना सुरु केली त्यावेळी इमामशाहांनी प्रत्यक्ष तेथे हजर होवून पाण्यात बुडत असलेल्या जीवनला बाहेर काढले व स्वतः नौका परत वेगाने चालवून पैलतिरी नेवून पोहचविली.

पुढे ते प्रवास करीत करीत 'जुणबदीना' या गावी येवून पोहोचले. त्यांच्या किर्तीचा डंका आता सर्वत्र वाजत होता. त्यामुळे त्यांना शत्रू पण बरेच निर्माण झाले होते. जुणबदीना या गावी आल्यावर खोजा धर्मस्थानातील उर्मट आणि सत्तांध स्वार्थी लोकांची कीर्ति त्यांच्या कानावर आली. तेव्हा त्यांनी गरीब वेष धारण करुन खान्यांत म्हणजे खोजाधर्मस्थानात प्रवेश केला.काही खोजांनी इमामशाहांना तुच्छ समजून त्यांचा अपमान केला. तेव्हा इमामशाहा म्हणाले मी संत कबीरदीनचा मुलगा आहे; या सर्वबाह्य गोष्टीकडे दुर्लक्ष करुन तुम्ही एकमेव सत्यज्ञानाकडे पाहण्याचा दृष्टीकोण ठेवा. तुम्ही अभिमान करुन रीतभात सोडून आडव्या मार्गाने जाऊ नका. परंतु मदांध खोजालोक यांतले काहीच समजू शकले नाही आणि ते त्यांना खान्यातून बाहेर घालवू लागले. त्या

लोकांना भय निर्माण झाले की हा आपली येथली गादी बळकवून बसेल.

परंतु इमामशाहा यांना तर गुजराथकडे जायचे होते. शिवाय हिंदूमध्येच त्यांचाच बनून राहाण्याची त्यांनी शपथ घेतली होती. खोजालोकांचा अभिमान दूर करण्यासाठी ते येथे उतरले होते परंतु त्या लोकांनी काही एक न ऐकता त्यांना जेवणही दिले नाही, उलट एका असंस्कारी माणसाने तर त्यांना तीन लाकडया मारल्या. इमामशाहा यांना किंचीतही क्रोध आला नाही. ते अतिशय शांत आणि प्रसन्न चित्ताने या लोकांचा नाद सोडून चालु लागले.

सद्‌गुरु इमामशाहा हे विकाररहित आणि ब्रम्हरुप असल्याने ते कोणालाही दोष न देता पुढे चालू लागले. तेव्हा रस्त्यात प्रेमजी खोजा नावाचा मनुष्य पुढे आला आणि अतिशय आदराने इमामशाहांना घरी घेऊन गेला त्यांना भोजन दिले व त्यांची कृपा संपादन केली.

नंतर त्यांनी पुढचा मार्ग आक्रमण करायला सुरुवात केली. जाता जाता ते चितोडगड या गावी आले आणि गावाबाहेर एका झाडाखाली बैलगाडी सोडली आणि ते आराम करु लागले. त्यावेळी 'वेलर' नावाचा एक गवळी तेथे इमामशाहाजवळ आला. तो गुरुजींना पाहून प्रणाम करुन त्यांच्या चरणाशी बसला. इमामशाहांनी त्याचे कुशल क्षेम विचारले व किती मुलबाळं आहेत असे विचारताच तो ढळढळा रडू लागला व म्हणाला स्वामी मी तीन बायका केल्या तरीही निपुत्रिकच राहिलो. रडता रडता त्याचा कंठ सुकला. गुरुजी त्याला समजावून म्हणाले -

वेलर चिंता करु नकोस. भगवंत सर्वांची इच्छा पूर्ण करणारे आहे. तू व तुझे कुटूंब 'अेसावर' गावी जा तिथेच तुला भगवंताच्या आशीर्वादाने पुत्र प्राप्ती होईल. सद्‌गुरुच्या सांगण्याप्रमाणे अेसावर गावी

जाऊन तो राहिला. कालांतराने त्यास तीन पुत्रांची प्राप्ती झाली व सुखाने तो तिथे नांदू लागला.

या पुढचा प्रवास करतांना ते हाजरबेग सहित 'शिरोई' या गावी उतरल्याचा उल्लेख मिळतो. नंतर मारवाड मधून पुढे प्रवास करीत दिल्लीला जाऊन पोहोचले. तेथे त्यांनी शाहदुल्ला मशिदीत मुक्काम केला. नमाज पढण्यासाठी अनेक लोक येऊ लागले. इमामशाह मात्र ध्यानस्थ बसून ईशचिंतन करीत होते. कुतुहलाने सर्व लोक त्यांच्याजवळ जाऊन म्हणाले, "महाराज ! आपण मुसलमान दिसता आणि नमाज का पढत नाही ?"

Imamshah himself admits that he is Muslim →

इमामशाह नम्रतेने म्हणाले, "माझी नमाज खुदाने मंजूर करुन टाकली आहे. तुमचा आग्रहच असेल तर माझ्या ऐवजी हे मशिदीचे मनोरे नमाज पढतील." आणि खरोखरच मशिदीचे मनोरे खाली वाकले.

इमामशाह म्हणाले, 'जरी मी मुसलमान कुळात जन्मलो असलो तरी सर्वांचा स्वामी एक व त्याची प्रार्थनाही एकच. अशा परमेश्वराच्याठायी मी लीन आहे! माझ्यात धर्मभेद अथवा जातीभेद नाही. कर्मधर्म संयोगाने मी येथे येवून पोहोचलो आहे.

इसी मिट्टीमे सारी दुनिया निपाया ।
इसीमें कौन हिंदू कौन मुसलमाना ।।

ही बातमी दिल्ली शहरात वा-याप्रमाणे पसरली व त्या वेळचे दिल्लीचे बादशाह 'बहलोल लोदी.' या अफगाणी राजाच्या कानावर ही बातमी आली. बादशहा उत्सुकतेने त्या महापुरुषाचे दर्शन करण्यास आले . त्यांनी इमामशहांना प्रश्न केला–

शहर दिल्लीमे आईया,बडे करामती शाह ।

पाक दिदार पेखने , आय खडे पातशाह ।।
बहलोल खान आयके,साईको किन्ही सलाम ।
साई नमाज पढते नही, बुझो पाक कलाम ।।

यावर इमामशहा आपल्या अमृत तुल्य वाणीने बोलले -

पाच नमाज हृदयमें रहे , बेहद नमाज सोय ।
हरदम लगे नमाजमें , ताको नमाज कहाँ होय? ।
नमाजसे बहाना करे, वे नही मुसलमान ।
रोज नमाज बखानते, आपे बडे मोमिन ।
कहाँ हिन्दु इस्लाम कहाँ, पीव खोजे सोही प्रविण ।

बादशाह बहलोल खान शांत चित्ताने ऐकत असलेला पाहून पुनः इमामशाह सांगू लागले-

सायाको खोजत फिरे , पियरा तिहारी पास।
बिलखत मृग फिरे बावरे, बन बन सुंघे घास ।।
सायाजीकी गम नही, भूले हिंदवा दिन ।
व्रत आचरमे हिंदवा, रोझा नमाज मोमीन ।।
रेन दिन लागी रहे, साहिबसे इकतार ।
अैसे साधु फकीर को, बहूरी मेरा जुहार ।।
बहलोल बुझी साइको, झंझट छोड दो आन ।
नेक बाते इमामकी, बेरही कबहू बखान ।।

असा हा उच्च कोटीतला साध्या भाषेतील उपदेश ऐकून बहलोल बादशाहाचे मन प्रसन्न झाले. ते आदराने गुरुजींना म्हणाले, "महाराज आपण आपल्या स्वखुशीने माझ्याकडची काहीतरी भेट स्विकार करा. मला आनंद होईल."

इमामशाह म्हणाले 'मी तर फकीर आहे .मला काहीच नको. मला फक्त परब्रम्ह परमात्म्याच्या दर्शनाचीं गोडी आहे. अन्य लौकिक गोष्टी मला नको. परंतु बादशाहाने त्यांना प्रवासाकरिता एक रथवजा बैलगाडी दिली.

दिल्लीहून निघाल्यानंतर गुरुजी मध्य प्रदेशातून मजल दर मजल प्रवास करीत करीत भोपाल, उज्जैन, इंदूर, निमाड मधून थेट बऱ्हाणपूर येथे आले. तेथे बरेच दिवस थांबून आजूबाजूच्या गावी जाऊन धर्मोपदेश दिला. तेथून ते वऱ्हाड भागात गेले तेथे अकोला, आकोट, सुरजी, अंजन व थेट दक्षिणेकडे कोचरब भागात गेले तेथे निजामाशी नदी तिरावर एक प्रसंग घडून आला व निजामसुध्दा त्यांचा तपः प्रभाव व तेजःपुंज व्यक्तिमत्व पाहून दिङ्मूढ झाला.

कोचरब जाने के लिये, सरितातट आये गुरुवीर ।
निजाम कहे ठाढे रहो, किसविध होत अधिर ।।
रथ सहित गुरु देवजी, जलपर चले प्रविण ।
लोगन सब देखत रहे, निजाम हुये मतिहीन ।।
कोचरब में गुरुदेव को, इक साल किये निवास ।
सुभागी कई जीव की, पूरन किये गुरु आश ।।

कोचरबच्या आजूबाजूस फिरुन गुरुजींनी एक वर्षभराचा मुक्काम केला. खानदेश मधून जात असता त्यांनी बराच शिष्य संप्रदाय वाढविला.अशा प्रकारे मूळ सनातन देवयान मार्गाची शिकवण देत देत व सत्पंथ सनातन तत्त्वाचा उपदेश करीत करीत बाल इमामशाह व हाजरबेग महाराज यांचा महाराष्ट्रातून खानदेशातून पूर्व खानदेश मधून जात असता फैजपूर या गावी मुक्काम झाला. रात्री प्रवचन करतांना

त्यांनी सांगितले या ठिकाणी काही काळातच माझे पाचवे धाम स्थापन होईल. माझ्या सत्पंथी बांधवांना मी आताच बधाई देतो की सर्व धामात हे श्रेष्ठ गणले जाईल. कारण या ठिकाणचे आचार्य बाल ब्रम्हचारीच राहतील, येथून गुरु महाराज पश्चिम खानदेशात गेले असे वर्णन सद्भक्त नायाकाका महाराजांचे परमशिष्य गंगासिह गोहिल यांनी काव्यरुपाने केलेले आहे. त्यातले काही वेचे खालील प्रमाणे ,

दक्षिण देशमे विचरते, सोनगढ आये साई ।
आये पीराना जानके, सेवक आये धाई ।।
लोगनके दुःख दूर करे, साईकृपा बरसाय ।
रोग मिटाये जीवोंका, छीनमे किये सुखदाय ।।

सोनगढला मुक्कामी असतांना त्यांचा कीर्तिरुपी सुगंध सर्वत्र पसरला. लोक दर्शनाकरीता व आपापल्या लौकीक आशा आकांशा त्यांच्या कृपाशिर्वादाने पूर्ण करुन घेण्याकरिंता आले, महापुरुषांच्या सान्निध्यात आल्यानंतर त्यांच्या सर्व इच्छा तर पूर्ण होतच पण त्याच बरोबर त्यांच्या पारलौकिक परमार्थिक आशा आकांक्षासुध्दा पूर्ण होत असत.

सुखानन्दको सोनगढ, नैन दिखे गुरुदेव ।
धाम लाछोरा चल बसे , आये अवधू भेव ।।

लाछोरा -

लाछोरा पहूँचे गुरु, हो गये आनन्दकन्द ।
दरश पीराणा धायके, मिट गये दुःख द्वन्द्व ।।
रक्तकोढी गजेश्वरी ,ता घर पहूँचे जाय ।
कृपा बडी इमाम की, महारोग मिटाय ।।

भक्तवमरस -

समरस भक्तजना, उरमे छाय उमंग ।
सदगुरुके चरणमे, लगे सवाया रंग ।।
वमरस घरकी दुविधा, छीनमे मिटाय साई ।
आनंद वाधे अति, सबही जीये सुखदाई ।।

भक्तसुरभाण -

सुरभाण को सदगुरुकी,मानो लागी लगन ।
निशतनप गुरुचरणमें ठाढे रहे मगन ।।
सुरभाणकी गती कैसे बुजे अजाण ।
गुरु चरणमें लग रहे, आठो जाम सुजाण ।।
सत्गुरुबानी उचरे , धन्य सुरभाण अनुराग ।
आवागवन ताको नही,भव उबरे ही सुभाग ।।
खटमास गुरुदेवजी ,ठाढे लाछोरा ग्राम ।
परहितकारी साईया,चलने लगे बहुनाम ।।

मोहन भक्त -

मोहनको सदबोधसे ,जगे हियामे हेत ।
ताही की गति को लिखे,उबरे कुळ समेत ।।

लासाजी चमार -

लासाजी चमारके,पूरन हुअे सब काज ।
कृपाबडी गुरु देवकी भव उबरे सुखसाज ।।

उदाजी पढियार -

साया मेरी कोनगत, शरण राखो गुरु पीर ।
उदाजी पढीयारको, गुरु दिखे गुण गंभीर ।।

गायीका जयश्री -

तवायफको अकर्मसे साहिब कियेरी नेक ।
बडी सुभागीन हो गई, जयश्री जुगमे नेक ।।

प्रवास करीत असतांनाच सदभक्तांना मार्गदर्शन करीत दुःखितांचे दुःख दूर करीत मजल दरमजल मुक्काम करीत ते थेट पश्चिम सागराकडे वळले . नवसारी,सुरत,कानम भागात गेले कानमच्या घनदाट अरण्यातून जात असता विख्यात लुटारु 'नाया' चा समागत्त त्यांना झाला . आपल्या तपःप्रभावाने त्यांनी त्यांच्यात परिवर्तन घडवून आणले व सन्मार्गाला लावले. त्यानंतर खंबायतला गेले . खंबायत येथे बरेच दिवस राहिले. खंबायत ,पेटलाद देवा या भागात ते आले. दरम्यान संवत १५१२ च्या सुमारास म्हणजे इ.स. १४५७ च्या सुमारास त्यांचे लग्न खदिजाबेगम नावाच्या सुंदर मुलीशी झाले. ती भडीयादवाला सैय्यद महंमद बुखारीची कन्या होती असे सांगतात. वैवाहिक जीवनात ते अत्यंत सुखी व समाधानी होते. त्यांना एकूण तीन मुले व एक मुलगी झाली . बाकरशहा,बालाशाह व नूरमहंमदशाह आणि शम्सखातून नावाची कन्या झाली तिला सर्वजण बाली असेच म्हणत . अशी चार अपत्ये झाली पण यांतील नूरमहंमदशाह सोडून बाकीची दोन मुले व मुलगी ही लहानपणीच स्वर्गवासी झाली तेव्हा इमामशहांचा मुक्काम खंबायत परिसरात होता . त्या परिसरात त्यांनी दहावर्षांचा काळ व्यतीत केला.

Marriage of Imamshah

Nurmuhammad Shah is son

अशी आख्यायिका आहे की खंबात येथील जहागिरदाराचा मुलगा व इमामशहांचा मुलगा बालेशाह हे जीवलग मित्र होते. बालेशाह आठवर्षांचा असतांना दैवयोगाने त्याच्या मित्राचे प्राणोत्क्रमण झाले. जहागिरदाराचा तो एकुलता एक मुलगा असल्याने सर्वांना फारच दुःख झाले . बालेशहाला

तर आपलाच जीवप्राण गेला असे वाटले . त्याने सहजगत्या चिरनिद्रेत पहुडलेल्या आपल्या मित्राच्या अंगावरुन विभूती फिरवून मंत्र म्हणून हाक मारली व त्याच्या अंगावरील चादर बाजूस केली तो आश्चर्य म्हणजे तो मुलगा जीवंत होवून उठून बसला. सर्वांना आनंदी आनंद झाला. सर्वजण बालेशाहाची वाहवा करु लागले.

इमामशहांना जेव्हा ही हकिकत समजली तेव्हा त्यांनी बोलावून विचारले की 'बाळा! मोहवश होऊन तू हे जे कृत्य केले, कोणच्या हुकुमावरून तू मृतक मुलीवंत केलेस'.

बालेशाह म्हणाला, 'मी स्वतःच हे काम केले. तुम्ही म्हणत असलेल्या मंत्राचा जप करून मी माझ्या मित्राला जीवंत केले'.

इमामशाह म्हणाले, 'बाळा! यात तू शास्त्र नियमांचा भंग केला. एक तर तुला अजून व्रतबंध संस्कार झालेला नाही आणि तुला अजून शास्त्रोक्त पध्दतीने दीक्षादिलेली नाही. जोपर्यंत दीक्षा घेतली जात नाही तोपर्यंत कोणताही मंत्र जाप करण्याचा वा असे काहीतरी प्रयोग करण्याचा अधिकार नसतो आणि दुसरे असे की असले कृत्य जाहिर रीतीने करायचे नसतात. बडेजावाने तू हे कृत्य अज्ञानपणाने जरी केले असले तरी अग्नीस अज्ञानपणाने जरी स्पर्श केला तरी दाह हा होतोच. त्याप्रमाणे निसर्गनियमांचे उल्लंघन तुझ्या हातून घडल्याने त्याचे प्रायश्चित तुला घ्यावे लागेल. बाळा अंतःकरण खूप जड होत आहे पण नियमांचे उल्लंघन पुढे कोणाकडून घडून येऊ नये म्हणून नाईलाजाने तुला प्रायश्चित्त घ्यावे लागेल'.

बालेशाह म्हणाला, 'पिताजी, मी अज्ञानपणे व मोहवश होऊनच हे कृत्य केलेले आहे, पण आपण जे प्रायश्चित्त मला द्याल ते

अगदी आनंदाने भोगायला मी तत्पर आहे आपण आज्ञा द्यावी',

इमामशाहांचे अंत:करण गलबलले पण कर्तव्य कठोरतेने ते म्हणाले, 'बाळा, प्रायश्चित्त एकच ते म्हणजे जीवाच्या मोबदल्यात जीव तुझे आयुष्य तुझ्या मित्राला दे. याशिवाय योग्य प्रायश्चित्त नाही'.

बालेशाह म्हणाला, 'पिताजी आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे ती पालन करण्यात मला आनंद व आत्मिक समाधान आहे. आपण मला आपला दिव्य आशिर्वाद द्या व जन्ममरणाच्या फेऱ्यातून मला सोडवा. आज माझे जीवन धन्य झाले'.

पित्याची आज्ञा शिरसावंद्य मानून त्याने तेथेच समाधी लावली व तो ब्रह्माशी एकरूप होऊन गेला. त्याचा पंचप्राण ब्रह्मात विलीन झाला हे दृश्य पाहून लहान बहिण बालीबेन अतिशय शोकमग्न झाली. आपल्या प्रेमळ भावाचा विरह तिला असह्य झाला. तिने सुध्दा आपली आत्मज्योती प्राणप्रिय भावाच्या शोधात ब्रह्मात विलीन केली.

अत्यंत दारूण असा तो प्रसंग. हे सर्व अनाकलनीय विपरीत दृश्य पाहून सर्वांची अंत:करणे शोकाकुल झाली. सर्वजण शोकमग्न झाले जहागिरदार आला त्याने झालेल्या अपराधाबद्दल क्षमा मागितली. आत्यंतिक दु:खाने इमामशाहांनी आपल्या दोनही अपत्यास नारंगसर तलावाच्या तीरावर अंत्यविधी केला व त्यांच्या स्मरणार्थ तेथे एक भव्य दर्गा स्मृतिमंदीर उभारले. इमामशाहांनी लवकरच तेथून आपला मुक्काम हलविला.

पुढे इमामशाह महाराजांनी अनेक प्रसंगांना तोंड देऊन प्रवास सुरूच ठेवला. त्यांना अनेक जातीच्या,अनेक स्वभावाच्या लोकांशी त्यांचा संबंध आला. भावनगर, जुनागड, राजकोट, बडोदा, नडियाद,

खेडा वगैरे भागातून जात असतां त्यांना कोठेतरी आपण स्थिर व्हावे असे वाटे पण नियत स्थान त्यांना जे पाहिजे ते मिळत नव्हते. खेड्याहून निघून ते गीरमथाला आले. गीरमथाच्या उत्तरेस अरण्य होते पण काही काळ त्या भागात पाऊसच पडला नाही म्हणून लोकही पाण्याकरीता व वैरणचाऱ्याकरीता वणवण फिरत होते . अशा परिस्थितीत इमामशाहांचा तिथे मुक्काम झाला. इमामशाहांनी गांव पाटलाकडे वैरणचाऱ्याकरीतां हाजरबेग यांना पाठविले.

हाजरबेगने सर्व हकीकत पाटलास सांगितली व बैलाकरीतां थोडा चारा मागितला. पाटलांनी चारा तर नाखुशीनेच दिला व गुरू महाराजांच्या वचनावर सुध्दा विश्वास ठेवला नाही. लोकांचे दुर्भिक्ष्य दूर व्हावे म्हणून इमामशाहांनी भगवंताची आराधना केली. मध्यरात्रीच्या सुमारास मुसळधार पावसास सुरूवात झाली व रात्री वीज पडली ती पाटलांच्या घरावरच. पाटलांचा एकुलता एक मुलगा त्यात भाजला गेला. पाटलांना पश्चात्ताप झाला पण श्रध्देने त्या मुलाला घेऊन इमामशहांच्या तंबूत नेले. पाटलांचा मुलगा दैवीशक्तिने जीवंत झाला व इमामशहांनी ठरविले की आपण याच जंगलात आपले स्थान प्राप्त करू. अशारितीने पीराणा हे स्थान तेथे प्रगट झाले.

गीरमथा –

गीरमथामे देखिया, सप्तसाल अकाल, ।
रहम किये गुरूदेवजी, सचमुच हुवे सुकाल ।।
मेहा आये धायके हो गये जयजयकार ।
मेदनी आयी दोडके पावे गुरू दीदार ।।

पटेलपुत्रसजीवन –

ग्राम्य मुखीके पुत्रको,सद्‌गुरू दिये जीवाय।
ताथे मेरा साईको, घर घर लिखे महिमाय ॥

कुवारीका क्षेत्र –

तीर फेके गुरू पीरको, कुवारिका क्षेत्र माया।
कर्ण भेदाये केसरी,झुक कर हुये बिदाय॥

सदगुरू स्थान –

स्थान बनाये साइको , पीरजी कीये निवास।
ताथे लोगन उचरे , यहाँ पीराणा खास॥

पीराणा धाम –

पीर इमामकी रहमसे , बसे पीराना धाम ।
पीरोंका पीराना हुअे , लिखे पीराणा ग्राम॥

वि.सं. १५२४ मध्ये रोजाचे (स्मृतिमंदीराचे) स्थान बनविले

Imamshah himself built his tomb at Pirana

VS 1524 = Year 1467-68

पंद्रहसे चोविसमे,रोजास्थान स्थपाय।
समाधी अपने हाथसे, साया को बनवाय॥
परचा बहूत गुरू पीरका, कैसे लिखे अजान।
जाको गुरू गम पाईया, ताको मिल गयी शान॥

वि.सं.१५५७ मध्ये गुरू इमामशाह पूर्णविराम पावले -

Death of Imamshah

नारायणके अंशसे प्रगटे पीर इमाम।
पंद्रहसो सतावनमे पाया पूर्णविराम॥

अभिलाषा –

ज्योति जगी अविनाशकी , मानो पूर्ण प्रकाश ।
गंगा सदगुरू इमामशाहकी , अहर्निश कर हूं आश॥
बैठे रहु गुरू चरणमें, चाहू दिदार साई ।

गंगाकी यह आरजु , मानो पाक पीराई ॥
साया तुमेरा बनी रहू ,सुनो सद्‌गुरू इमाम ।
गंगाको अपनो लीखों, बिरद बडो बहुनाम ॥

सद्‌गुरू इमामशाहांनी पीराण्यास स्थान प्रगट केल्यानंतर ते तेथूनच धर्मप्रचार व इतर कार्य करू लागले . बरेच योगी, मुनी, संत,विचारवंत, समाज प्रवर्तक लोक तेथे येऊन अनेक वार्तालाप धार्मिक चर्चा ,विचार विनिमय करीत. सर्वांचा आदर सत्कार मानमरातब त्यांच्या त्यांच्या योग्यतेने करून इमामशाह अत्यंत लोकप्रिय झाले. तसेच त्यांच्या जीवनात अत्यंत घोर प्रसंग सुध्दा आले. अनेक जातीच्या, अनेक स्वभावाच्या लोकांशी त्यांचा संबंध आला. रमजू कसाई, गोजारी अहिरण, मनखाजी अहिर, एका ब्रम्हराक्षस – खविसचा त्यांनी उध्दार केला. जुम्मा खुरासानी या विख्यात फकिराशी धर्मचर्चा संबंधघडून आला.

मलिक महंमद, हाजीकालू मालिक शअबान, याकुतशाह, बाकरभिस्ती, गायिका मायावती, बन्नासिंह हाडा, जंभासिंह, तुंवार मंकासेन जुगल बनझारा, हिरजी नाविक , सेजलदे , सवदास, मौलाजादा अलकी खान, मलिका हिराबाई वगैरे अनेक लोकांचा समागम झाला. अनेकांशी धर्मनीती बाबतीत चर्चा वादविवाद संवाद झाले. कित्येकांचे अज्ञान दूर करून त्यांना ज्ञानी बनविले. अशा प्रकारची व्यक्ती असेल तशा प्रकारचे वर्तन त्यांच्याशी करून व सर्वांना सुनीती सत्पंथाचे मार्गदर्शन करून त्यांना सन्मार्गावर आणले. विशेषत: नायाकाका,भाभाराम, कीकीबाई,शाणाकाका या पूर्वजन्मातील तपश्चर्यावान योगी लोकांशी ज्ञानचर्चा करून त्यांना

जागृत केले व त्यांनी सुप्त, केवळ सांसारिक जीवनकर्मात व्यग्र असलेल्या सनातन सत्पंथ धर्म नीतिशास्त्राची जाण लोकांना दिली, व त्यांचे ऐहिक, पारलौकिक कल्याण केले. अनेकानेक संत महात्मा पुरूषाशी सुध्दा इमामशाहांनी संपर्क साधून आपल्या कर्तव्याची जाण त्यांना दिली. गोस्वामी तुलसीदास, चैतन्य महाप्रभु गुरूनानकशाह, महात्मा दादुदयाळ, संत सूरदास, संत कबीर, संत साध्वी मीराबाई तसेच योगी निरंजननाथ, सिध्दपुरूष योगी अडभंगनाथ ,योगी जान्हवीदास, योगी सतानंद, योगी रसिकनाथ आदी तत्कालिन सिध्द ज्ञानी महापुरूषांशीसुध्दा इमाशाहांचा संतसमागम घडून आला.

सदगुरू इमामशाहांचा प्रवास जरी बराच घडला तरीपण त्यांचे उपदेशाचे क्षेत्र बहुशः गुजराथ मध्येच आहे. म्हणून त्यांचे वाङ्मय जे उपलब्ध आहे ते विशेषतः गुजराथी भाषेतूनच आहे, क्वचीत हिंदी मराठी मिश्रीत असेही काही वेचे आहेत त्यांचे मुख्य शिष्य म्हटले म्हणजे संत नायाजी, संत भाभाराम, संत साध्वी कीकीबाई आणि संत शाणाजी हे होत. गीरमथाला आल्यानंतर बहुतेक त्यांनी आपला प्रवास थांबवला व तेथेच जवळ पीराणा स्थानी वास्तव्य करून सत्पंथ धर्मपीठ स्थापन केले.

त्यानंतरही बरेच चमत्कार सदगुरू इमामशहांच्या हातून झाले पण केवळ चमत्कार हे त्यांचे क्षेत्र नसून ज्ञानदान करणे हेच त्यांचे क्षेत्र होते.अनेकानेक संत महापुरूषांशी त्यांचा धर्माविषयी वेद वअध्यात्माविषयी वाद संवाद झाला . सदगुरू इमामशाहांची भूमिका वेदान्त तत्वज्ञान पटवून ,द्यायची होती विवादाची नव्हती. त्यामुळे ते सर्वांना प्रीय झाले

प्रिय भाभाराम,अशा प्रकारचे माझ्या गुरू महाराजांचे जीवन सौम्य, शांत, धीरगंभीर वाहणाऱ्या नदी प्रमाणे आहे. अनेक अडचणी अनेक अडथळे त्यांच्या जीवनात आले पण त्यांच्या अंगच्या सौजन्याच्या प्रेमाने ते अडथळे त्यांनी सोडविले . महापुरूष आपल्या आत्मप्रौढीचा प्रपोगांडा न करतां स्वत: दु:ख सहन करतात व परोपकाराची कामे करीत असतात. त्यांचे सर्वच चरित्र अनाकलनीय असते.

Death of Imamshah
02-Mar-1500

सदगुरू इमामशाह महाराज समाधीस्त झाले त्यावेळेस त्यांनी सांगितले होते की संवत १५५७ मध्ये चैत्र शुध्द बीजेला मी समाधी घेईल तेव्हा या रोजाचे चारही दरवाजे बंद करून घ्यावे . दुसऱ्या दिवशी सकाळी एक प्रहर झाल्यानंतरच दरवाजे उघडावे. मी तुम्हाला सतत अखंड दर्शन देईल. वेळ प्राप्ती होताच सदगुरू महाराज समाधी स्थानात शिरले त्यांच्या सांगितल्याप्रमाणे दरवाजे बंद करण्यात आले . सकाळी सवा प्रहर दिवस वर आल्यावर दरवाजे खोलले तो काय दिसले लोकांना ! एक ज्योत अंगुष्ठमात्र ज्योत लोकांना दिसली .सदगुरू माऊली त्याच ज्योतीमधून प्राणिमात्राला पाहतात व जशी ज्याची शक्ति तसा त्यांना आशिर्वाद देत असतात.

This is planted story to justify the existence of Tomb of Imamshah

इस्लामी सत्तेचा पुढील इतिहासात त्रास होऊ नये म्हणून समाधी स्थानावर कबर-उभारली गेली. समाधीस्थानात इमामशाहांच्या कबरेशेजारी डावीकडे त्यांच्या पत्नीची व उजवीकडे त्यांच्या मुलाची कबर दिसते. बाहेरच्या बाजूस सर्वत्र कबरच दिसत असल्या कारणाने लोकांची श्रध्दा डळमळीत होते पण त्या बाकीच्या कबरी इस्लामी सत्तेत जबरदस्तीने बांधल्या गेलेल्या असल्याने त्यांचा विचार सामान्य

Tombs of Wife and Son - Nurmuhammad Shah

Tomb of Hazarbeg

माणसाने करू नये. रोजाचे समोर हाजरबेग महाराज यांची कबर उन्हात तळपते पण ती थंडच राहते. हाजरबेगला फूल चादर चढविल्याशिवाय इमामशाहांना चढविली जात नाही.

नायाजींचे स्थान कुकस येथे आहे करजण सांढलीहून पाच किलोमिटर दूर हे स्थान आहे. तेथे नायाजींची सुध्दा समाधी असून कबर केलेली आहे. तसेच नडीयाद वसोहून १० कि. मि. वर असलेल्या रूण गांवी कीकीबाईचे मंदीर आहे व तेथून २ कि.मि. वर भाभारामचे मंदीर आहे. रूणहून थोड्याच अंतरावर भाभाराम महाराजांचे तपश्चर्या स्थान आहे. चंपारण्यात भाभाराम व कीकीबाईची गाठ पडली व कीकीबाईने भाभारामचे वचन पालन करून तिथेच राहिली. सद्गुरू इमामशाहांनी हेच स्थान त्यांना दिले व गादीस्थापन करून शिष्यपरंपरेने वहिवाट करण्यास परवानगी दिली.

अशा प्रकारचा हा सद्गुरू इमामशाह महाराज व त्यांच्या परम पावन शिष्यांचा इतिहास आहे. जो ह्या सद्भक्तांचे व गुरू महाराजांच्या चरित्राचे पारायण करेल त्यास त्रिविधतापापासून मुक्ति मिळेल. त्याच्या छप्पन्न कुळांचा उध्दार होवून तो स्वतः अमर स्वर्गीय सुख भोगेल.

ॐ

श्री सद्‌गुरूना श्लोक. (दोहावली)

पूज्यपाद सद्‌गुरू इमामशाहांनी बऱ्याच ठिकाणी दोह्यांच्या रूपाने उपदेश केलेला आहे. त्यांच्या मुखातील ती अमृतवाणी श्रवण करण्याकरिता लोक उत्सुकतेने व आतुरतेने प्रतिक्षा करीत. त्यांच्या मुखातील काही दोहे या या ठिकाणी देत आहोत. बरेच दोहे काळाच्या ओघात वाहून गेले.

श्री सद्‌गुरू ब्रम्हा वाचा सत्य छे.

सद्‌गुरू कहे रे,

पीयु पीयु सब जग कहे। अने पीयु न पावे कोयरे ।।
मुखे जपता पीयु ना मळे। अे तो शिरके साटे होयरे ।।१।।
शिरका साटा ते करे। जो रयेणी जगावे आपरे ।।
जीव लगावे जीकरशु। तो साचा सृजन पासरे ।।२।।
पीयु पीयु जीव जंत करे। अने पीयु न पावे कोयरे ।।
जीभु जपता पीयु जो मिले। तो बगज हंसा होयरे ।।३।।
बग हंसानो पठंतरो । अने दिसे ते अेकज रंगरे ।।
बग चरे मीन मानीया। हंस चरे रे रतन ।।४।।
काच रतननो पठंतरो। अने कसता ते पाड्ये भातरे ।।
काच कमाये विष भर्यो। भाई रतन अजवाली रात रे ।। ५।।
सुगरा नुगरानो पठंतरो। सब सुरत एक समान ।।
नुगरा चहावे दामकू। अने सुगरा हरी का नाम रे ।।६।।
नाम लीधामा अंतर घणो। जे प्रेमशु प्रीत ना लायेरे ।।

धुल उपर जेम लीपणा। जेम फुट्या मांदल बजाये रे ।।७।।
प्रेम भक्ति तेणे हृदे वसे। जे अंतर लेह लगायेरे ।।
स्वास उस्वासे जपीये। जेम काने श्रुत न जायेरे ।।८।।
जिसमे इमान प्रगट्या। तिसथी गफलत होवे दूरे ।।
त्याहा अंधारा क्या करे? ज्या सृजन केरा नूरे ।।९।।
नुर ते मंदीर समारीया। अने नुरे रच्यो असमानरे ।।
नुर माहेथी नुर प्रगट्या। तेनु सद्‌गुरू ब्रम्हा नामरे ।।१०।।
अमे आव्या परलोकथी । दशे असमान जोयरे ।।
रंग भोग पदवीये बहु रमे। पण प्रेम थोडामा होयरे ।।११।।
भाग्य वडा ते लोकना। जेणे किधा तपतिर्थ व्रत दान रे ।।
स्वर्ग भोगवी ते उतर्या। पण नही वळख्या श्री भगवानरे ।।१२।।
संसार भुला ने जग अंधा। सुनसु पुजा लायेरे ।।
पाबड्याने जो पानो चढे। तो जीव मुगता होयरे ।।१३।।
भ्रमणाये जग वही रह्या। अने भटकता भुलायेरे ।।
जेणे साचा सद्‌गुरू ना भेटीया। ते केमकरी अमर थायेरे ।।१४।।
सोना रूपा माहे साच हे। अने दिजे अगन केरी आसरे ।।
बीन रसायन गालीये तो। केम करी होवे रसरे ।।१५।।
गुरू के शिर गांठडी। अने सेवक के शिर भाररे ।।
लोहा नाव जो बेसीये। तो केम उतरीये पाररे ।।१६।।
गुरू अंधा तेना चेला नर अंध। अने दोये ना जाणे ज्योतरे ।।
आप मुरादीने मन हटी। तेतो मुये ना पामे मोक्षरे ।।१७।।
जुठा मरणा सब जग मरे। अने साचा न मरे कोयरे ।।
गुरू ज्ञान वेध्या जे मरे। तेना फरी मरण ना होयरे ।।१८।।

संसार सागर मोहजाल हे। अने शिरपे भरीया भाररे ।।
सत्यकी नावे बेशीये। तो सद्‌गुरू उतारे पाररे ।।१९।।
नाव कीजे हरिना नामनी। अने साचा ते भरीये भाररे ।।
पवन जो चाले प्रेमका। तो सद्‌गुरू उतारे पाररे ।।२०।।
भोळावे जीव तू भुलीयो। सद्‌गुरू दुजा मत जाणरे ।।
जीव पींडना छे जे धणी। जेणे निपाई चारे खाण रे ।।२१।।
चारे खाणी जीव तू आपीयो। अने भम्या ते बहु अपार ।।
पूर्व पुण्य ते पोता तणो । जे पाम्यो मनुष्य अवतार रे ।।२२।।
मनुष्य देह पाम्या तो शु थयु ? । अने ना जाण्या मुक्तीना भेद रे ।।
माणक मोटा तो शुं थया?। जेणे अंतर पडिया छेदरे ।।२३।।
मनुष्य देही तो दुर्लभ छे। ते तो नही आवे वारोवार ।।
पात्र पिछाणी परिब्रम्ह पुजिये। तो कुळनो होवे उध्दार रे ।।२४।।
काल सीचाणो तारे शिर भमे। अने मत काई बांधो आश रे ।।
दमे दमे हरीने जपीये। जेंम रवी उगे प्रकाश रे ।।२५।।
रवि उगे अजवाला थया। अने रेणी ते होवे दूर रे ।।
नवे खंड माहे देव प्रकाशिया। जेम प्रभाते उग्या सूररे ।।२६।।
रवि उग्याने सर्वे दिन कहे। अने रेणी ना कहेवे कोयरे ।।
एम सद्‌गुरूथी जीवने मोक्ष छे। अवरे थी मोक्ष ना होयरे ।।२७।।
अमे आव्या स्वर्गथी। अने लाव्या मुक्तीनो भेदरे ।।
जेणे सद्‌गुरूना नुर भेटीया। ते अमर हुवा ततखेवरे ।।२८।।
प्रत्यक्ष जुओने पारखु। जो साचे मने पत आये रे ।।
लौहा पारस जो मिले। तो पलमा कंचन थायेरे ।।२९।।
इयळ भ्रमरीनो पठंतरो। अने लई मंदीरमा जाय ।।

भ्रमरी चटको इयळ सहे । तो आप समाना थायरे ।।३०।।
गंगा ते आव्या स्वर्गथी । अने लाग्या ते विष्णुने चरण रे ।।
अनेक नदीयु आवी मले । सर्वे ते होवे गंग वर्ण रे ।।३१।।
गंगा ते तीरथ बहु फळे । तीर्थे ते सद्गुरू नुररे ।।
अे प्रभाथकी आलगा रह्या । ते कहावे नदीयु केरा नीररे ।।३२।।
भूतभक्ती सब जग करे । ते तो पडिया मोटे फेर रे ।।
जंगले जीव अनंत वशे । तेणे कोण बतावे सेर रे ।।३३।।
जंगले जीव भुल्यो पड्यो । ते किसकु पुछे राह रे ।।
अे महावनमा माणस मळे । तो ते ठिकाण बतावे रे ।।३४।।
साचा झुटाना पारखा । अने परखो ते परखण हार रे ।।
मोती जो भांग्यु विंधता । तेनु मुल नही ने पाडरे ।।३५।।
साचाने शिर चढावीये । अने कहिये ते अंतरनी वातरे ।।
जुठाने कोई पुछे नही । जेने न जडी पीयूकी धातरे ।।३६।।
जुठाने जगपत लावशे । अने साचकु मारे लात रे ।।
पण जुठे जुठा जो आवी मळे । त्या बोल ते पाच ने सात रे ।।३७
सभा सोहातु सर्व बोले । कोई बोले ना सत्य धर्म रे ।।
आप वखाणे परनिंदा करे । भाई ते शिर बेशे करम रे ।।३८।।
कर्म ते सर्वे उतरे । ना उतरे परनिंदा ने आळ रे ।।
परगमन ना उतरे । ना उतरे आत्महत्या ने बाळ रे ।।३९।।
पाच हत्या तो पापीणी । जे शिर बेशारे लाये रे ।।
ते नित्य नित्य जई गतमा मळे । तोये जीव पावन ना थाय रे ।।४०।।
तप तिर्थ व्रत यज्ञ करे । अने देवे भुमीना दान रे ।।
तोये कर्म न अेवा उतरे । जो करे गंगानु स्नान रे ।।४१।।

पाच हत्या ते परलोकथी । अने लखी जो होये ललाटरे ।।
फाटे पण अे फिटे नही । अे तो भोगवी छुटाये रे ।।४२।।
अधोगतीये जीव अवतर्यो । अने पडियो ते चारे खाणरे ।।
अंधुरेथी जो इंडु गळे । ते उग्या शुं जाणे भाण रे ।।४३।।
जन्म अंधो ते जीव रह्यो । तेनी ज्योत गई बीशार रे ।।
पापी परब्रम्ह पेखे नही । ते शु जाणे शरणाशरण रे ।।४४।।
सहस्त्र पचासा ते भोगव्या । अने पाम्या ते मनुष्य देह रे ।।
दया क्षमा धरम जाण्या नही । जेम उनाळे उठ्या मेह रे ।।४५।।
नगरे नीर खलखल्या । जई भळीया जमना गंगारे ।।
पापी पावन अेणी पेरे थाये । जो मांडे हरीशु रंगरे ।।४६।।
रंगरे जैसा पतंगका । तेने तैसा दुनियाका रंग रे ।
कमळ रंग भेदे नही । तेने सर्व दिशे कढंग रे ।।४७।।
बाना ते पेहेरे बापडे । अने जुग दिखावे महंत रे ।।
खाये पीये पींड पोषे आपणु । पण न करे जीव निश्चिंत रे ।।४८।।
सत्य का बाना पेहेरीये । अने अंतर लेह लगाये रे ।।
स्वांस उस्वासे ओराधीये । जेम काने श्रुत ना जाये रे ।।४९।।
आप समारो साचशुं । अने सत्यको करो सणगार रे ।।
नयने काजल सारो नेहका । पियु करो गलेका हार रे ।।५०।।
शुरा होकर शिर देवे । अने देह सामाकु धाये रे ।।
जीव ना राखे आपणा । पछे मुये निवेडो थाय रे ।।५१।।
मुआ सो जेना मनमुआ । अने धरती समाणा आपरे ।।
आ पाचे तत्वका पुतला । तो जपे अजंपा जाप रे ।।५२।।
जग सारा निर्धन भया । धनवंता ना देखु कोय रे ।।

धनवंता नर ते आखीये। जेनी प्रीत पीयुशु होय रे ।।५३।।
सो धन संचे बापडे। जेमा कोई न घाले हात रे।।
जन्म मरण गंजे नही। पछी मुयें ते आवे साथ रे ।।५४।।
अमी पीये विष उतरे। जल पीये तरस बुझाय रे।।
भोजन लीधे जेम क्षुधा भागे। तेम हरीनामे पातक जाय रे ।।५५।।
गाली सो सब छांडीये। अने माहे ते लावो जीव रे।।
जन्म गमावो प्रेमशुं। तो पामो आपणा पीव रे ।।५६।।
पीयु पीयु सब जुग करे। बोले जेम मुखे बात रे।।
पीयु पीयु जीव जंत करे । पण कोई न जाणे धात रे ।।५७।।
धात अमारी तो सो बुझे। जे कोई चाले साचे सेर रे ।।
सो घर पोता आपणा। सो कदी ना आवे फेर रे ।।५८।।
प्रेम पीयासी मन वशे। जो मन माही कीजे नेह रे।।
दुनिया दुरिजन दाखवे। ते जल बल होवे खेह रे ।।५९।।
प्रीत पीयुनी दोहेली। प्रेमेशुं पडिया सोल रे।।
कनक कसोटी जो आप करो। तो पामो चुंदा मोल रे ।।६०।।
मूल पाया सो माणेक भया। जेणे लाग्या कलेजे बाण रे।।
वज्रर विंझया लागे नही। ते तो पर्वत केरा पाण रे ।।६१।।
पाषाण परमोद्या गुण करे। अेंथी विपरीत नुगरा जाण रे।।
रणमें न आवे ढुंकडा। जेम गुंण वीनाना बाण रे ।।६२।।
गुरू ब्रह्माजी अेम बोलीया। अे तो समजे ते साचा कोय रे।।
अढी ते अक्षर प्रेमना। भाई पढे सो पंडित होय रे ।।६३।।
पंडित पढीया बोहोत फरे । अने साचा ना लिया सेर रे।।
ज्युं बोहोतेरा दोडीये। त्युं पडिये मोटे फेर रे ।।६४।।

फेरे पडे उनकी फुटी आंख। मंदिर माहे क्या जोये रे ।।
स्वामी ते खेले प्रगटा। तेनो मरम ना बुजे कोयेरे ।।६५।।
भेष हमारा कालेसरी। ते जुग देखी बीहाये रे ।।
गुणवंता गुण राखीये। जेनी मुये किर्ती लखाये रे ।।६६।।
भेष ते सारा जुग करे। अने क्रिया प्रगट दिखायेरे ।।
जिभु जपता पीयु ना मिले। सो मंदीर पीयु ना पाये रे ।।६७।।
पीयु पीयु करता पीयु ना मले। शिर उपर भरीया भार रे ।।
सो खेले मन मोकला। जेम भांगी नावे पार रे ।।६८।।
गोर ज्ञानी जुगमा बहोत हे। अे पाये चरणामृत आपरे ।।
जो मर्म ना जाणे मोक्षका। अे तो अदका करना पाप रे ।।६९।।
पाप प्रजाळीने लोडीये। जो तनना टुकडा होये रे ।।
जो दम उठे नाभथी। सो दम ना बुझे कोये रे ।।७०।।
दमे दमे हरीने जपीये। अवर चित्त ना लाये रे ।।
न पियु पठंतरो रती रहे। जेम सायेर लेहेर समायेरे ।।७१ ।।
जिकरे लावे जीवडा। जो रहेणी आवे हाथ रे ।।
जो दम उठे नाभथी। ज्युं पीयुंशु करणी बातरे ।।७२ ।।
वाते वडा ना होइये। कर माला मुख नामरे ।।
साच विना जे जपणा। जेम उजड खेडा धाम रे ।।७३।।
सुन पुजी ने शुं करो। पण जागती ज्योतने ध्यावो रे ।।
प्रतीत ना आवे ज्या लगी। तबलग चोरासी फेरा खावोरे ।।७४।।
उज्जड खेडा फिर वसे। अने निर्धनिया धनिक होय रे ।।
गया जोबन बावरे। भाई मुवा ना जीवे कोय रे ।।७५।।
सतीया सतीया सब कावे। पण सती ते तो बिरला कोयरे ।।

सब जग सुये ने आप जागे । तेने जिकरे दर्शन होय रे ।।७६।।
अडसठ तीर्थ मे गया । अने जोया ते देव अनंत रे ।।
आपे देवल देवता । मुनिवर हिरदे वसंत रे ।।७७।।
सब तिर्थ मे ढुंडीया । कई पाणी कई पाषाण रे ।।
उज्जड घर का परोणला । सो कैसा पावे मान रे ।।७८।।
घर उपर ज्युं दिवडा । पण माहे अंधारी रात रे ।।
फोगट धोणा बारका । भाई काशल ना जावे साथ रे ।।७९।।
गंगा जमना सरस्वती । अने न्हाइये गया प्रयाग रे ।।
जो अंतर दाग ना उतरे । जेम लील करावे भाजरे ।।८०।।
तीर्थ त्रिवेणीमा न्हाईये । अने जपीये अजंपा जापरे ।।
जो पाचे पवित्र किजिये । तो कुळना जावे पापरे ।।८१।।
परनिंदा घरनिंदा थशे । जो करो अजाणी वात रे ।।
नरके पडे जीव आपणा । होये इकोत्तेरसो संगात रे ।।८२।।
जीभु जुठा ना बोलिये । दिल भितर राखीये ठाम रे ।।
दया सरीखा कोई मित्र नही । अंतः काळे नारायण नाम रे ।।८३।।
पूरण प्रीत त्यात पियु वशे । पण वण प्रीते तो दुरे ।।
जेम जलमध्ये तो कमल छे । तेना अंग ना भेदे तोयरे।।८४।।
घटमो तीर्थ सन्मुखा । अने घटमा धर्म द्वार रे ।।
जो घटमा देवल पूजीये । तो घटमा मोक्ष द्वार ।।८५।।
भलका ते वागे भावना । अने पडे सो प्रेम के धायेरे ।।
पीडा जो लागे पियुशु । तीसे रेणीये निंद न आये रे ।।८६।।
निंदा बिचारे शुं करे । पण हैया जो होवे हाथ रे ।।
पियु पीयु करता रेणी जागे । भाई पिछे ते होये प्रभात रे ।।८७।।

प्रभाते रवी उगमीया । ते नवखंडे हुआ प्रकाश रे ।।
ज्या जोइये त्या तेटलो । अेम अंतर पियुजी के पास रे ।।८८।।
सोना वेची साजन लिजीये । होये मोती जो केरे मोल रे ।।
ते साजनने केम छोडीये । भाई लोका ते केरे बोल रे ।।८९।।
हरी तो बोले बोले लिजिये । होये अंतर पियुनी पिछाण रे ।।
शिरके साटे जो हरी मले । तो ये मोंघेरा मत जाण रे ।।९०।।
शिरके साटे लिजिये । जो हरी वेचाता होय हाट रे ।।
क्षेणु विलंब ना कीजीये । शिर हाथु ते दिजे काट रे ।। ९१ ।।
प्रेम वाडीये न निपजे । अने प्रेम हाटे न बेचाये रे ।।
प्रेम तो हैडेथी उपजे । अे तो हैडा कोरी कोरी खाय रे ।।९२ ।।
प्रेम रस अति मिठडा । अने देखे जो कोई चाख रे ।।
स्वामी जो पाये शिरलगीं । त्यारे हैडा ते देवे साखरे ।।९३ ।।
हरिरस जेणे चाखीया । अे अवर रस मुखे ना लाये रे ।।
प्रेमे माता ते तो माहे रहे । ते तो हरिरस बेठा खाये रे ।।९४ ।।
मुज विहर्णीने पीयु मिले । कोई दाग दियो नव जाये रे ।।
मास गलीगली भोये पडे । भाई पींजर देही गलाये रे ।।९५ ।।
सती थी सोह क्यु रहीं । ना जली पीयु केरी लाये रे ।।
जा जा रेमुई घेलडी । तुजे प्रेमे लाज न आये रे ।।९६ ।।
मोये करे तो पीया पीया । पण पाखर नाखीये जोये रे ।।
नाखणहारा ते क्या करे । जेणे बाण न लाग्या होये रे ।।९७ ।।
लीला ते गैरव छाई रहया । अतो पाणी तणो स्नेह रे ।।
सुका साल बिचारा क्या करे । जो अखंडा वर्षे मेहरे ।।९८ ।।
उगे तेणे वंदीये । वारो होय ते तेनी आण रे ।।

काले भोजन जे जम्या । तेनी आज तो केवी वखाण रे ।।९९ ।।
भुलावे जीव वही रह्यो । अने भुल्यो ते मोह जाल रे ।।
चोर्यासी फेरे जीव तु आवीयो । तो ये न मार्या पाचे काल रे ।।१०० ।।
पाचे काल जेणे वश कर्या । ते तो मरी मरी दे जुगे पाये रे ।।
सद्गुरू सारथी जेणे किधा । ते जीव अमरापूर जाये रे ।।१०१ ।।
दुनिया दुरिजन दूर करी । जो अंतर हरी शुं लाये रे ।
गुरू दिपक लई हाथमा । ढुंढण मंदीर पायु जाये रे ।।१०२ ।।
दुनिया आह धुमाकारे । अेनो जरा न बुजे भेदरे ।।
सुन ते पूजे प्रतिमा । भाई विता ते वाचे वेद रे ।।१०३ ।।
दुनिया दोडा दोड बहुत करे ।अने दर्शन ना पावे तोयेरे ।।
उजड घर जई उतरे । त्या भोजन ना देवे कोये रे ।।१०४ ।।
सत्य की वाटे ढुंडीये । जिस बाटे हरी गया जोये रे ।।
कान गाता वाता वासली । ते गोकुल मुकी ज्या होये रे ।।१०५ ।।
अे साची वाटे ढुंडीये । चाल्या होय हरी जीस वाट रे ।।
जोता जोता हरी लीजिये । पावे तो नेहडा घाट रे ।।१०६ ।।
पगले पगले सोधीये । अेवी लीजीये सुधी वाट रे ।।
सत्यविना जे जे दोडीया । सो तो पडिया चौर्याशी घाट रे ।।१०७ ।।
वेळा तो आवी वखडी । हवे चेतो चेतनहार रे ।।
आप राखो तमे आपशु । भोई चलना अे खांडाधार रे ।।१०८ ।।
सत्य तो शुळी उपर नाचणा । अे खेले ते खेलन हार रे ।।
सामी ते आणिये धसणा । जो भलका भी होवे पार रे ।।१०९ ।।
कोल हमारा साचा हे । अे साचे मने पत आये रे ।।
फरी फरी नही आवणा । इकोत्तरसो साथे जाये रे ।।११० ।।

गईबाता जे करे । पण जरा ना बुजे भेद रे ॥
चारे जुगे जीव भुलीयो । अे सत्य कहे गुरू वेद रे ॥१११॥
प्रत्यक्ष उग्या प्रगटया । तो भीतर चांदरणा होय रे ॥
सोल कलानु अजवालियु । तेनी बुजे रसायण कोय रे ॥११२॥
रसायण सारी सत्यकी । अने सत्यसु चाल्या जावो रे ॥
पण सत्यविना जे चलणा । तो बहु बहु फेरा खावो रे ॥११३॥
कलियुग माहे अथर्ववेद हे । अने थर नही संसार रे ॥
जे वेदने वायके चालीया । ते तरकर लाग्या पार रे ॥११४॥
कलियुग माहे कोई थर नही । अे तो थर नही निर्वाण रे ॥
पण थर विना जे चलना । ते तो मार खासे मैदान रे ॥११५॥
कलियुग आव्यो वखडो । अने वेला ते वही वही जाये रे ॥
पेट समी कोई प्रीत नही । कोई केने न देवे काय रे॥११६॥
पाच करोड कर्ता युगे तर्या । जे होलीये सींचाणा आप रे ॥
सद्‌गुरू पूजा जेणे सेविया । जेणे मनसु न खाधी धाप रे ॥११७॥
त्रेताये हरिश्चन्द्र आवीया । ते सीध्या करोडी सातरे ॥
सतीये सेव्या स्वामी अेकमना । ते करता सत्यनी वातरे ॥११८॥
द्वापार युगे क्रोड नव तारीया । ज्या पांडवे गळावी देहरे ॥
तेणे सत्य राख्या आपणा । हरी शु छाना राख्या नेहरे ॥११९॥
कलियुगे सद्‌गुरू ब्रम्हासाचा । अने साचा ते करोडी बाररे ॥
साचा सद्‌गुरूने सेवीया । तेने करता न लागी वार रे ॥१२०॥
गुरू साचा ते तो कहिये । जेणे कागलना किधा जहाज रे ॥
बार करोडी बेठ चाल्या । चोवीस राख्या बाजरे ॥१२१॥
गुरू इमामशाह बोलीया । तमे सुणो मुनिवर वीर रे ॥

सद्गुरू पुरा जेणे सेवीया । ते सफल पाया सधीर रे ॥१२२॥
अमे आव्या स्वर्गथी ।अने देखता भोवन सातरे ॥
रंग भोग पदवी त्या बहुमले । पण नही कोई अमर जातरे ॥१२३॥
सोना सुवर्ण पुतळी । अने दिजे तें झाकन झोल रे ॥
पीयु पाया जेणे प्रेमेशु । पाम्या ते अमर मोहोल रे ॥१२४॥
सद्गुरू समंदर बेलीया । अने संसार लहेरे पुरे ॥
गुरूनर बेलीये बैठे चले । उपर वरसन लागा नुर रे ॥१२५॥
जो दम उठे नाभथी । अवर चिंतन लाय रे ॥
जीकरे फीकरे जागीये । तो जीव वैकुंठ जाय रे ॥१२६॥
बाहेर दिसे उजला । मुखे बोले मीठी वात रे ॥
कहेणी कहे पण रहेनी नही । जेम कुसुंबी भात रे ॥१२७॥
जरा कुती जोबन सशो । आयो आहारडी नीत रे ॥
अेरण वचे घेर कीजीये । तो कुशळ शुं पुछे मींतरे ॥१२८॥
अंतर नही रे साईशु । घट जो निर्मळ होय रे ॥
काटे भराणी आरसी । मुख न देखे कोय रे ॥१२९॥
प्रीत लागी केम जाणीये । जेणे पाचे तत्व किधा वश रे ॥
काम क्रोध जेणे वश कर्या । तेना तन चढीया कश रे ॥१३०॥
प्रीत लागी केम जाणी ये । भाल भीतर भाजे भ्रांत रे ॥
पगले पगले डरी चालीया । तो पीहु आने शरम रे ॥१३१॥
मुरखने परबोधता । ज्ञान गाठनो जाये रे ॥
टपले सरांड चढाईयें । तो आरशी कधी ना थाये रे ॥१३२॥
साचा न छपे बावले । जो छपावे कोय रे ॥
चंदकु ढाले ढापीये । तो खेणु खेणु प्रगट होयेरे ॥१३३॥

जैसा बाओ बंद है । तैसा आ संसार रे ॥
आवता आवे जोरमा । तेणे जाता न लागे वार रे ॥१३४॥
मोक्ष मार्ग दोहेला । चलना खांडा धार रे ॥
सुळी उपर खेलना । कोई खेले खेलन हार रे ॥१३५॥
संसार भुल्यो शोधता । गया ते जुग चार रे ॥
जेणे हरीं पाया प्रगटा । ते उतरी गया पार रे ॥ १३६॥
सेर कारण शिर मुंडावीया । पेहेरी टोपी माल रे ॥
पींडपखाली चहुदिस न्याहाळे । पण कर्मकालनो काल रे ॥१३७॥
दर्पण धरे न टिला करे । पींड सोहावे सार रे ॥
भुखे भांडाने आस पीयारी । ते आवसे चौर्यायशी माल रे ॥१३८॥
धणी आगल झुंजणा । मुँह उपर झटका खायेरे ॥
अने ओ अंग विधावीया । पिछा न खेचे पाय रे ॥१३९॥
प्रीत पीहाकी दोहेली । चलना खांडा धार रे ॥
शिर उतारी खेलीये । कोई खेले खेलन हार रे ॥१४०॥
प्रीत पीहाकी सोहेली । जो होवे दृढ विश्वासरे ॥
आपज चाले आपणु । तेजे अमरापुरीनो वास रे ॥१४१॥
प्रीत पीहाकी जे समजे । जे कोई जाणे आपरे ॥
प्रभु आव्यावीण सहेज जागीया । तेनु सर्वेजनमना लोपे पाप रे॥१४२॥
पढीया तेनी फुटी आँख । तो जलबल होवे खेह रे ॥
नवशा चोर परगडा । तेना मरम न बुझे कोय रे ॥१४३॥
मुनिवर मुनिवर सब कोई कहे । मुनिवरना भेद न जाणे कोय रे ॥
जे आपगळी गुरूनी वाचा पाले । ते साचा मुनिवर तोयरे ॥ १४४॥
साचा पंथ अेही सतका । साचा अेही शहेर रे॥

जे कोई चाले सतवीना । ते पडसे मोठे फेररे ॥१४५॥
जैसा दुधमा घृत छे । तैसा तुझ माहे प्राण रे ॥
ऐसा जगमा स्वामी वसे । सब घट व्यापक जाणरे॥१४६॥
अहेरनका घाव हिरो सहे । तेना माहे गडी जाय रे ॥
मुनीवर अेवा लोडीये । जेम नमक पाणीमां घुली जायरे ॥ १४७॥
धीर धरो रे मुनीवरो । धीरे थी सबकुछ होय रे ॥
माली सींचे सौ घडा । पण ऋतुवीना फल न होय रे ॥१४८॥
जैसा तीलमा तेल है । अने काष्टमा अगनी जाण रे ॥
अैसा दुधमा घृत है । पण मंथे तो परगट जाण रे ॥ १४९ ॥
सृजन जगना दातार छे । ते पुरावे सहु कोई नी आस रे ॥
दुरना देखो तारा दिलमा वसे । जेम छुपा है फुलमा वास रे ॥१५०॥
अगर जलता गुण करे । अने चंदन घसीने जोय रे ॥
अवगुण उपर गुण करे । बलहारी प्रभु कहे तोयरे ॥१५१॥
जबलग तनमां प्राण है । तबलग चेतो मारा वीर रे ॥
नीत नीत जीकरे जागीये । अेम कहे छे इमामशाह वीर रे ॥ १५२॥

परमपूज्य प्रातर्वन्दनीय सद्‌गुरू श्री इमामशाह महाराजांची ही मौखिकवाणी आहे. सत्‌पंथाची शिकवण देतांना त्यांनी अशा प्रकारच्या वाणीचा उपयोग केलेला आहे. त्यांच्या वाणीचा भावार्थ जाणून घ्यायचा असला तर आचार्य श्री जगन्नाथ महाराज यांनी प्रकाशीत केलेल्या "अमृतवाणी" या पुस्तकात पहावा.

Amrut Vaani

सद्गुरू इमामशाहांचे भजन.

हमे वरस नवना हता। ने रहेता ऊंचनगर माहेजी ।।
त्रण जोगी आव्या तैया। झोली ते लावीया साथजी ।।१ ।।
एकनु नाम केशर कहिये। बीजो मधकेशर जाणजी ।।
त्रीजो जोगी केशापुरी कहिये। ते आव्या त्रण त्या साथजी ।।२ ।।
त्रणे गाडी भरी दसोंद लाव्या। रूपीया साडासात लाखजी ।।
उपर त्रण रूपीया कहिये। लाव्या पोतानी साथजी ।।३ ।।
जोगी ते तो कहेवाने लाग्या। गुरूजी ते हमने बतावोजी ।।
गुरू ते जे ज्योत प्रकाशे। दसोंद लेवेज सोहीजी ।।४ ।।
सर्वे मली विचारज करे । मोटु रूप केम लेवायेजी ।।
हमे चालीने आगळ आव्या। बीजानु ना लिधु नामजी ।।५।।
गंगा जमुना मुखमा देखाडी। जाहेर ज्योत प्रकाशीजी ।।
केशवपुरी मुलताननो कहिये। नवग्रह दिठा तेणे हाथजी ।।६ ।।
मे मारा अंतर खोल्या। त्या कैलासी ते तो कहेवायजी ।।
गुरूना जोग पंथ देखाड्या। ते तो आवीने लाग्या पायजी ।।७ ।।
आमने रूपीया सर्वे सोपीया। तेवोने 'योगवाणी' सुणायाजी ।।
गुरू इमामशाह कहे कैलासी। योगेश्वर सांभळो ये ज्ञानजी ।।८ ।।

पीराणा - दर्शन

घेऊ दर्शन सारे मिळूनी सद्‌गुरूरायाचे ।।
नयनी पाहु मंदिर आपण इमामपुरचे ।।धृ ।।
दक्षिणेच्या प्रवेशद्वारा सामोरा आले ।।
हाजरबेग प्रेमी भक्तांचे दर्शन झाले ।।
मन प्रफुल्लीत झाले गुरूद्वार दर्शनाने ।। नयनी पाहूं ।।१ ।।
हातपाय स्वच्छ करू गंगाकुआ तिथेची ।।
रम्य भासे इमामपुरी काशिक्षेत्रची ।।
प्रथम होई दर्शन शुभ्र धवल ध्वजेचे ।। नयनी पाहू ।।२ ।।
चारी दिशा कोट मध्ये पीराणा वसे ।।
लहान सहान खोल्या बहु सुगंधी असे ।।
सर्वांमध्ये ठिकाण शोभे समाधीस्थानाचे ।। नयनी पाहूं ।।३ ।।
अखंड ज्योतीचे दर्शन घेऊ रम्य जी असे ।।
स्वर्गिचा तो कल्पवृक्ष अन् वीट कळस दिसे ।।
बेडी घालूनि पायामध्ये आपुले भविष्य पाहू ।। नयनी पाहू ।।४ ।।
सद्‌गुरूंच्या कबरेखाली भुयार असे ।।
ध्यान करूनी बघता सत् समाधी दिसे ।।
दर्शन घेऊनी सार्थक करू मानव जन्माचे ।। नयनी पाहू ।।५ ।।
दास म्हणे जगी असे भक्त हे झाले ।।
प्रेमे तया गुरूदेवाने आंत बैसविले ।।
समाधीस्तव तेही तेथे रमले नित्याचे ।। नयनी पाहू ।।६ ।।



धर्मपीठ पीराणा येथील समाधि मंदीर.

त्या अलौकिक दिव्य स्वरूपाचे ज्यांनी प्रत्यक्ष दर्शन घेतले होते अशा त्या पाचही जणास ते ज्या दिशेकडे बघत असत तिकडे सद्‌गुरू महाराजांच्या दिव्यस्वरूपाचे दर्शन होत असे. त्या समाधि मधील मधूर गानातून एक दिव्य गंभीर वाणी सर्वांना ऐकू जाईल अशा रीतीने बाहेर पडली. तिचा साररूप हाच होता की, 'हे माझ्या परमसुहृद सद्भक्तांनो! प्रिय बालकांनो, तुम्ही बाकी राहिलेले तुमचे आयुष्य सदा सर्वकाळ अपार कृपेचा सागर त्या परब्रह्म परमात्म्याच्या नामस्मरणात घालवून सर्वकर्मे त्यासच अर्पण करून त्याचेच सर्वतोपरी चिंतन करून दास बनून तद्रूप होऊन जा. त्या परब्रह्म परमात्म्याचा जो दहावा अवतार 'श्री निष्कलंकी नारायण' या कलियुगाचे अंति ज्यावेळेस प्रगट होईल, त्यावेळेस आपणा सर्वांचा पुनर्मिलाप होणारच आहे. तो पर्यंत हे सद्भक्तांनो त्या परमपूर्ण प्रेमानंदाच्या अलक्ष्य, अगम्य, अगोचर, अद्भुत लिलेचा अनुभव घ्या.' हा दिव्य संदेश देऊन ती वाणी परम विराम पावली.

email: mail@realpatidar.com